# <u>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)</u>

**सभा क्र. ०३/ २०१४** **दिनांक १५.०२.२०१४**
**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी ०४.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शनिवार दि.१५.०२.२०१४ रोजी दुपारी ०४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस/ वशी-०४/ ५२६१/ २०१४, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१४ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दि.१५.०२.२०१४ रोजी दुपारी ०४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्रीमती रुबल अग्रवाल, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्या
०३. मा.श्री.अजय मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ०४.०२.२०१४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.१५२** **सदरहु विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.**

---

**विषय नं.०२** **दिनांक १०.०२.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.१५३** दि.१०.०२.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१** **<u>श्री साईप्रसादालय येथील २५० KVA जनरेटर रुम पार्किंग शेड व मेन्टेनन्स ब्लॉक जवळील मोकळया जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी प्राप्त निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.</u>**

श्री साई प्रसादालय परिसरात मुख्य इमारतीचे लगत तसेच जनरल टॉयलेट, जनरेटर रुम चेजींग रुम अन्नदान कक्ष व पंपरुम या लहान मोठ्या इमारतीचे बाजुने पेव्हींग ब्लॉक बसविण्यात आलेले आहे. श्री साई प्रसादालय येथे नव्याने बांधण्यात आलेल्या मेन्टेनन्स ब्लॉक, पार्किंग शेड, तेल तुपाचे रिकामे डब्बे व बारदान ठेवणेकरीता उभारणेत आलेल्या शेडचे तसेच २५० केव्हीए जनरेटर रुम या इमारतीचे लगतचे मोकळ्या भागात पेव्हींग ब्लॉक बसविलेले नाही. सदरचे मोकळ्या भागात माती असल्याने पावसाळ्याचे दिवसात गवत उगवते त्यामुळे स्वच्छता राहत नाही. श्री साई प्रसादालय परिसरात स्वच्छता राखणेकामी परिसरातील उर्वरीत भागात पेव्हींग ब्लॉक बसविणे आवश्यक आहे.

दि.२५/०८/२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र. ६७१ अन्वये श्री साई प्रसादालय येथील २५० केव्हीए जनरेटर रुम, पार्किंग शेड व मेंटेनन्स ब्लॉक जवळील मोकळ्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी येणाऱ्या अंदाजे रु.८,३७,०००/- मात्रचे खर्चास तसेच विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन सिलबंद निविदा मागविणेस मान्यता देणेत आलेली आहे.

तथापी श्री साई प्रसादालय येथील दुचाकी वाहन पार्कींग शेडचे दक्षिण बाजुचे जमिन मालक श्री सुरेश बनकर (गट नं. ८१) यांनी दि.१५/१०/२०१३ रोजी सरकारी मोजणी केली होती. सदर मोजणीसाठी इकडील विभागाचे प्रतिनिधी हजर होते. त्यावेळी मोजणीदार संस्थानचे वहिवाटीस असलेल्या क्षेत्रात अंदाजे तीन गुंठे इतक्या क्षेत्रात हद्दी खुना दर्शविलेल्या आहेत. याबाबत खात्री करणेसाठी इकडील विभागामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे वाहन पार्किंगच्या पत्राशेडचा ५७० चौरस मिटर भाग वगळून जिल्हा दरसुची २०१३-२०१४ नुसार सोबत जोडलेप्रमाणे फेर अंदाज पत्रक तयार करण्यात आले असून त्यानुसार रु.५,४९,०००/- मात्र इतका खर्च येईल. सदर खर्च उपरोक्त रु.८,३७,०००/- मंजुर खर्चापेक्षा कमी आहे. त्यानुसार इकडील विभागामार्फत निविदा तयार करण्यात आलेल्या आहेत.

इकडील विभागाचे दि.२१/११/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये याकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता मिळाली त्यानुसार दि.१२/१२/२०१३ रोजीचे दै.पुढारी वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिद्ध करणेत आली.

याकामी दि.३०/१२/२०१३ रोजीचे सिलबंद निविदा सादर करणेचे विहित मूदतीत खालील सात निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | श्री बी.पी. शिंदे, पढेगांव | १६३०३ | ३०/१२/२०१३ |
| ०२ | श्री. अनील एम. गवळी, मढी | १६२९६ | ३०/१२/२०१३ |
| ०३ | मे.एन.एस. बनकर पाटील ॲण्ड असो. श्रीरामपूर | १६२९२ | ३०/१२/२०१३ |
| ०४ | मे. साई नॅचरल स्टोन, शिर्डी | १६२९४ | ३०/१२/२०१३ |
| ०५ | मे. साईदिप पेव्हर्स, निमगांव | १६२८३ | ३०/१२/२०१३ |
| ०६ | श्री. कृष्णा डी.शिंदे, शिर्डी | १६३०१ | ३०/१२/२०१३ |
| ०७ | श्री.एस.जी. गायकवाड, राहाता | १६२९१ | ३०/१२/२०१३ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०७ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | निविदेमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटी अंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे. साईदिप पेव्हर्स, निमगांव | ५,५९,३४७/- | ४,६०,०२३/- |
| ०२ | श्री. अनील एम. गवळी, मढी | ५,१२,२९९/- | ५,१२,२९९/- |
| ०३ | मे. साई नॅचरल स्टोन, शिर्डी | ५,७५,०२९/- | **४,५४,७९६/-** |
| ०४ | श्री.एस.जी. गायकवाड, राहाता | ४,९६,६१६/- | ४,९६,६१६/- |
| ०५ | श्री. बी.पी. शिंदे, पढेगांव | ५,३८,४३७/- | ४,७५,७०६/- |
| ०६ | मे.एन.एस. बनकर पाटील ॲण्ड असो. श्रीरामपूर | ५,२२,७५२/- | ५,२२,७५२/- |
| ०७ | श्री. कृष्णा डी.शिंदे, शिर्डी | ४,७४,७६५/- | ४,६५,२५१/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय येथील २५० KVA जनरेटर रुम पार्किंग शेड व मेन्टेनन्स ब्लॉक जवळील मोकळया जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे. साई नॅचरल स्टोन, शिर्डी यांचे रु.४,५४,७९६/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०२ **संस्थान मालकीचे मौजे निमगाव कोऱ्हाळे व कनकुरी येथील प्लॉटमधील विहिरींची खोली वाढविणेकामी प्राप्त निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

संस्थान मालकीच्या मौजे निमगांव कोऱ्हाळे, व कनकुरी येथील प्लॉटमधील ५ विहीरींची खोली वाढविणेकरीता विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९ लक्ष मात्रचे खर्चास मा. त्रिसदस्य समितीचे दि.३०.०३.२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्र. २६८ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

शिर्डी येथे श्री साईचे दर्शनाकरीता दिवसेंदिवस साईभक्तांची मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. संस्थानमार्फत साईभक्तांचे सोयी सुविधेसाठी निवास व्यवस्था, भोजनव्यवस्था माफक दरात करणेत येते. साईभक्तांचे निवास-व्यवस्था करिता बांधण्यात आलेल्या इमारतीकरीता पाणी पुरवठा करणेकामी कनकुरी येथे साठवण तलाव आहे. साईभक्तांची गर्दी वाढत असल्याने पाण्याचीही गरज वाढलेली आहे.

भविष्यात पाण्याची तिव्र टंचाई निर्माण झाल्यास त्यासाठी पाणी उपलब्ध होणेकामी व पाण्याचा साठा वाढविणेकामी मौजे कनकुरी येथील संस्थानचे गट नं.१२१ पैकीचे, १२७ व ११५ तसेच मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं. २३५ व गट नं. १८२ पैकी या प्लॉटमधील विहीरींची खोली वाढविणे प्रस्तावीत आहे. सदरहू विहीरीची खोली वाढविणेकामी इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन दि.२५/०४/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर निविदा मागविणेस मान्यता देणेत आली होती. सिलबंद निविदा सादर करणेची मूदत दि.२७/०५/२०१३ अखेर सायंकाळी ६ :०० वाजेपर्यत होती. विषयांकीत कामासाठी विहित मूदतीत फक्त एकच निविदा प्राप्त झाली होती. त्यामुळे दि.०६/०६/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये प्राप्त झालेली निविदा ठेकेदार एस.जी.गायकवाड, राहाता यांना परत करणेस तसेच फेरनिविदा मागविणेस व याकामी जाहिरात प्रसिध्द करणेसाठी मान्यता देणेत आलेली आहे.

याकामी फेर निविदा मागविणेसाठी दि.२१/१२/२०१३ रोजीचे दैनिंक पुढारी व दैनिक सार्वमत या वृत्तपत्रात निविदा सूचना प्रसिद्ध करणेत आली होती. याकामी सिलबंद निविदा सादर करणेचे दि.०६/०१/२०१४ पर्यंतचे अंतीम मूदतीत खालील ठेकेदार यांनी निविदा जमा केल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. भाऊसाहेब नाना यादव, राहाता | १६८२० | ०६/०१/२०१४ |
| ०२ | श्री.एस.जी. गायकवाड, राहाता | १६८६१ | ०६/०१/२०१४ |
| ०३ | श्री. बाबासाहेब पी. शिंदे, पढेगांव | १६८६९ | ०६/०१/२०१४ |
| ०४ | श्री. गोपीनाथ हरीश्चंद्र गांगड, रुई | १६८७० | ०६/०१/२०१४ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | निविदेमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटी अंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.एस.जी. गायकवाड, राहाता | १०,१४,५७०/- | **९,९९,०००/-** |
| ०२ | श्री. बाबासाहेब पी. शिंदे, पढेगांव | ३,९९,८५०/- (निविदेतील a, b व c मध्ये नमुद केलेल्य विहीरीकरिता) | अपात्र |
| ०३ | श्री. गोपीनाथ हरीश्चंद्र गांगड, रुई | २०,२३,१७५/- | १३,००,०००/- |
| ०४ | श्री. भाऊसाहेब नाना यादव, राहाता | १४,८०,०३५/- | १४,००,०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीच्या मौजे निमगाव कोऱ्हाळे व कनकुरी येथील प्लॉटमधील ०५ विहीरींची खोली वाढविणेकामी श्री.एस.जी. गायकवाड, राहाता यांचे रु.९,९९,०००/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, तसेच याकामी येणाऱ्या रु.९९,०००/- मात्र वाढीव खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०३ **संस्थानचे शिर्डी येथील स.नं.५४, ५५, १२५ मौजे निमगाव कोऱ्हाळे गट नं.८७, ८८ येथे शौचालय तयार करणेकामी प्राप्त निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

दि.१२/१२/२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णयान्वये श्री साईबाबा संस्थान मालकीचे शिर्डी येथिल सर्व्हे क्र. ५४,५५ तसेच सध्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला बस पार्किंगसाठी वापरात असलेल्या स.नं.१२५ मधिल जागेत आणि श्री साई प्रसादालयाच्या पश्चिमेस असलेल्या मौजे निमगांव को. गट नं.८७,८८ येथे साईभक्तांसाठी वहानतळाच्या जागेत पार्किंग व्यवस्था करणे बाबत सूचना दिली आहे. त्यामुळे साईभक्तांचे सोयीसाठी सदरहू ठिकाणी प्रत्येकी दोन शौचालय व प्रत्येकी दोन मुतारी असलेले टॉयलेट ब्लॉक करणे आवश्यक आहे. म्हणजेच एकुण तीन टॉयलेट ब्लॉक करणे प्रस्तावीत आहे. त्यानुसार याकामी रु.८,२०,५४८/- मात्र रक्कमेचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले होते.

विषयांकीत बांधकाम करणेसाठी उपरोक्तप्रमाणे एकूण तिन प्लॉटमध्ये टॉयलेट ब्लॉक तयार करणेसाठी खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता. यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.१२/१२/२०१२ रोजीचे सभेतील नि.क्र.२२४ अन्वये खालील प्रमाणे निर्णय समंत झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे टॉयलेट ब्लॉकचे बांधकाम करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व तीन तयार सुरक्षा कॅबिन खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागविणेस तसेच याकामी येणाऱ्या एकूण अंदाजे रु.१०,२२,१४८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली ".

उपरोक्त कामांपैकी रु.८,२०,५४८/- मात्र रक्कम तीन टॉयलेट करीता व रु.२,०१,६००/- मात्र तीन सुरक्षा रक्षक कॅबीन करीता मंजूर केली आहे. आता DSR २०१३-२०१४ चे दर सुचीनुसार तीन टॉयलेट करीता अंदाजे रु.९,३१,४८५/- मात्र इतका खर्च येईल. याकामी येणारे अधिकचे रु.१,१०,९३७/- मात्रचे खर्चाबाबत निविदा उघडून चर्चा/ वाटाघाटीनंतर मंजूर निविदेनुसार येणारे खर्चास मा.त्रिसदस्य समितीची मान्यता घेता येईल.

याकामी निविदा मागविणेसाठी दि.२१/१२/२०१३ रोजीचे दैनिंक पुढारी व दैनिक सार्वमत या वृत्तपत्रात निविदा सूचना प्रसिद्ध करणेत आली होती. याकामी सिलबंद निविदा सादर करणेचे दि.०६/०१/२०१४ पर्यंतचे अंतीम मूदतीत खालील ठेकेदार यांनी निविदा जमा केल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | मे.ओम मजुर सहकारी संस्था, औरंगाबाद | १६८६३ | ०६/०१/२०१४ |
| ०२ | श्री.एस.जी. गायकवाड, राहाता | १६८६२ | ०६/०१/२०१४ |
| ०३ | श्री. बाबासाहेब पी. शिंदे, पढेगांव | १६८६७ | ०६/०१/२०१४ |
| ०४ | श्री. अनिल एम. गवळी, मढी खुर्द | १६८७१ | ०६/०१/२०१४ |
| ०५ | मे.एन.एस. बनकर पा.कंपनी, श्रीरामपूर | १६८६५ | ०६/०१/२०१४ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०५ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | निविदेमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटी अंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.एन.एस. बनकर पा.कंपनी, श्रीरामपूर | ९,७८,०५९/- | ९,३१,४८५/- |
| ०२ | श्री. अनिल एम. गवळी, मढी खुर्द | ९,३१,४८५/- | ९,३१,४८५/- |
| ०३ | श्री.एस.जी. गायकवाड, राहाता | ९,१२,८५५/- | ९,१२,८५५/- |
| ०४ | श्री. बाबासाहेब पी. शिंदे, पढेगांव | ९,५९,४३०/- | **८,८४,९११/-** |
| ०५ | मे.ओम मजुर सहकारी संस्था, औरंगाबाद | ११,४५,७२७/- | ११,४५,७२७/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे शिर्डी येथील स.नं.५४, ५५, १२५ मौजे निमगाव कोऱ्हाळे गट नं.८७, ८८ येथे शौचालय तयार करणेकामी श्री. बाबासाहेब पी. शिंदे, पढेगांव यांचे रु.८,८४,९११/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, तसेच याकामी येणाऱ्या रु.६४,३६३/- मात्र वाढीव खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०४. **नवीन स्टाफ क्वार्टर सबस्टेशन परिसरामध्ये पेव्हर ब्लॉक बसविणेकामी प्राप्त निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

निमगांव कोऱ्हाळे शिवारामध्ये संस्थान मालकीचे सर्व्हे नं.१६९ मध्ये संस्थान कर्मचाऱ्यांकरीता नविन स्टाफ क्वार्टर इमारती बांधण्यात आलेल्या आहेत. सदर स्टाफ क्वार्टर करीता इमारतीचे वीज पुरवठाकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून उच्च दाब वीजपुरवठा जोडून घेण्यात आलेला आहे. त्यामुळे त्याठिकाणी सबस्टेशनमध्ये Two pole structure, transformer व Metering cubical यांची उभारणी करण्यात आलेली आहे.

दि.२६/०४/२०१३ रोजीचे पत्रान्वये सहाय्यक अभियंता, MSEDC Ltd, राहाता यांनी सबस्टेशन परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेस व Metering Cubical करीता शेड करणेस सूचविले आहे. याबाबत दि.०५/०६/२०१३ रोजीचे पत्रान्वये विद्युत विभागाने कळविले आहे.

नविन स्टाफ क्वॉर्टर येथील सबस्टेशन भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे करीता येणारे खर्चास मान्यता मिळणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/१०/२०१३ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहु सभेतील नि.क्र. ८६० अन्वये खालील प्रमाणे निर्णय झाला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेले कामासाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या रु.१,७१,४१०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

इकडील विभागाचे दि.२१/११/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये याकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता मिळाली त्यानुसार दि.१२/१२/२०१३ रोजीचे दै.पुढारी वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिद्ध करणेत आली.

याकामी दि.३०/१२/२०१३ रोजीचे सिलबंद निविदा सादर करणेचे विहित मूदतीत खालील आठ निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | श्री बी.पी. शिंदे, पढेगांव | १६२८९ | ३०/१२/२०१३ |
| ०२ | श्री. अनील एम. गवळी, मढी | १६२९७ | ३०/१२/२०१३ |
| ०३ | मे.एन.एस. बनकर पाटील ॲण्ड असो. श्रीरामपूर | १६२९३ | ३०/१२/२०१३ |
| ०४ | मे. साई नॅचरल स्टोन, शिर्डी | १६२९९ | ३०/१२/२०१३ |
| ०५ | मे. साईदिप पेव्हर, निमगांव | १६२८७ | ३०/१२/२०१३ |
| ०६ | श्री. कृष्णा डी.शिंदे, शिर्डी | १६३०० | ३०/१२/२०१३ |
| ०७ | श्री.एस.जी. गायकवाड, राहाता | १६२९० | ३०/१२/२०१३ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०७ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | निविदेमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटी अंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे. साईदिप पेव्हर, निमगांव | १,७२,८६९/- | **१,३८,९४२/-** |
| ०२ | श्री. अनील एम. गवळी, मढी | १,५८,३२९/- | १,५८,३२९/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | मे. साई नॅचरल स्टोन, शिर्डी | १,७७,७१६/- | १,४०,५५७/- |
| ०४ | श्री.एस.जी. गायकवाड, राहाता | १,५५,०९८/- | १,५५,०९८/- |
| ०५ | श्री. बी.पी. शिंदे, पढेगांव | १,६६,४०७/- | १,४७,०२०/- |
| ०६ | मे.एन.एस. बनकर पाटील ॲण्ड असो. श्रीरामपूर | १,६९,६३८/- | १,५०,२५१/- |
| ०७ | श्री. कृष्णा डी.शिंदे, शिर्डी | १,४६,७२९/- | १,४३,७८८/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन स्टाफ क्वार्टर सबस्टेशन परिसरामध्ये पेव्हर ब्लॉक बसविणेकामी मे.साईदिप पेव्हर, निमगांव यांचे रु.१,३८,९४२/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०५ **<u>फुड टेस्टींग प्रयोगशाळा उभारणेकामी फर्निचर तयार करणे कामाच्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.</u>**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधिल तरतूदः-** "२१ (१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहुन, समितीकडून सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईलः-

(घ) भक्तांना जेवण देणे आणि अन्नछत्र चालवणे."

**मा.व्यवस्थापन समितीचा निर्णयः-** मा.त्रीसदस्य समितीचे दि.२७/०४/२०१३ रोजीचे सभेतील नि.क्र.४२४ अन्वये अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ आणि नियम २०११ नुसार अन्न पदार्थांचे क्वॉलीटी कंट्रोल व पुथ्थःकरणसाठी श्री साई प्रसादालय येथे प्रयोगशाळा उभारणी करणेस मान्यता देण्यात आली आहे.

**प्रस्तावनाः-** संस्थानचे श्री साईप्रसादालयात फुड टेस्टींग प्रयोगशाळा उभारणेसाठी साईप्रसादालय विभागामार्फत फुड हायजिन ॲण्ड हेथ लॅबोरेटरीचे डॉ.अभय देसाई, डायरेक्टर, फुड हायजिन ॲण्ड हेल्थ लॅबोरेटरी यांची फुड टेस्टींग प्रायोगशाळा उभारणासाठी तज्ञ म्हणून नियुक्ती करणेत आलेली आहे. संस्थानचे जा.क्र.२८१९/२०१३, दि.२४/०९/२०१३ अन्वये आर्किटेक्ट विशाल पाटील, एलेगन्स आर्किटेक्टस्, पुणे यांची सदरहू कामी आर्किटेक्टक्चरल सेवा पुरविणेस नेमणुक करणेत आली आहे. फुड हायजिन ॲण्ड हेल्थ लॅबोरेटरी, पुणे यांची प्रयोगशाळेची आर्किटेक्ट यांनी दिनांक २५/०९/२०१३ रोजी पहाणी केली आहे.

नियोजीत फुड टेस्टींग प्रयोगशाळा संस्थानचे श्री साईप्रसादालयाचे पूर्वेकडील चेंजींग रुमचे एका भागात करण्याचे ठरले आहे. याकामी इकडील विभागामार्फत नियुक्त करणेत आलेले आर्किटेक्ट यांनी विस्तृत नकाशे तयार केले असून त्यास डॉ. अभय देसाई, डायरेक्टर, फुड हायजिन ॲण्ड हेल्थ लॅबोरेटरी यांनी मान्यता दिली आहे.

**प्रस्तावः-** श्री साईप्रसादालयातील फुड टेस्टींग प्रयोगशाळेकरीता अंतर्गत फेरबदल करुन फर्निचरची कामे करावे लागणार आहेत यात प्रामुख्याने खालील कामांचा समावेश आहे.

०१. चेजींग रुम मधिल जुन्या भिंती च्या फुटलेल्या फ्लोरींग टाईल्स व डॅडो टाईल्स काढणे.
०२. प्रयोगशाळेकरीता नविन फ्लोरींग व डॅडो टाईल्स बसविणे
०३. Sophisticated Instrument Room, Water section, व Food Section यांचे मधे पार्टीशन करणे
०४. विविध केमीकल ॲनॉलिसीस करीता ब्लॉक ग्रानाईट टॉप असलेले वर्क स्टेशन बनविणे
०५. विविध केमीकल व मशिनरी ठेवणेकरीता आवश्यकतेनुसार रॅक व फर्निचर मधे कपाटे करणे.
०६. आतिल बाजुने ऑईलपेंट रंगकाम व बाहेरील बाजुने ॲपेक्स पेंट रंगकाम करणे.

आर्किटेक्ट यांनी सदरहू कामी निविदा नकाशे व अंदाजपत्रक तयार केले असून प्रयोगशाळा तयार करणेकामी रु.९,५०,०००/- मात्र खर्चाचे अंदाजपत्रक तयार केले आहे.

**विभागाचे अभिप्राय/ मतः-** फुड टेस्टींग प्रयोगशाळा उभारणीकामी आर्किटेक्ट यांनी तयार केलेले अंदाज पत्रकानुसार येणारा खर्च हा रुपये १० लक्ष मात्रचे आत येईल, त्यामुळे सदर कामासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगीची आवश्यकता नाही असे मत आहे.

याकामी इकडील विभागाचे दि.२७/११/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये विहीत पदध्दतीने निविदा मागविणेस मान्यता मिळाली आहे. त्यानुसार दि.१२/१२/२०१३ रोजीच्या दैनिक पुढारी व दैनिक सार्वमत या वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिद्ध करुन निविदा मागविणेत आल्या दि.३०/१२/२०१३ पर्यंत सिलबंद निविदा सादर करणेचे मूदतीत खालील पाच ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | श्री बी.पी. शिंदे, पढेगांव | १६३०२ | ३०/१२/२०१३ |
| ०२ | सायली सेल्स कार्पोरेशन, संगमनेर | १६१४६ | ३०/१२/१०१३ |
| ०३ | मे.त्रिमीती इंटेरीअर्स, नाशिक | १६२९८ | ३०/१२/१०१३ |
| ०४ | मे.कार्पोरेट इन्फ्रा मॅनेजमेंट सर्व्हीसेस, पुणे | १६२९५ | ३०/१२/२०१३ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या **०४ सिलबंद निविदा** आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | निविदेमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटी अंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | श्री बी.पी. शिंदे, पढेगांव | १०,४१,२३९/- | ९,२५,०००/- |
| ०२ | मे.कार्पोरेट इन्फ्रा मॅनेजमेंट सर्व्हीसेस, पुणे | Does not qualify | अपात्र |
| ०३ | सायली सेल्स कार्पोरेशन, संगमनेर | ९,५४,२७०/- | **९,००,०००/-** |
| ०४ | मे.त्रिमीती इंटेरीअर्स, नाशिक | ९,९४,६५३/- | अनुपस्थित |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, फुड टेस्टींग प्रयोगशाळा उभारणेकामी फर्निचर तयार करणेकामी मे. सायली सेल्स कार्पोरेशन, संगमनेर यांचे रु.९,००,०००/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०६ **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डोमचे पॉलीकार्बोनेट शीट बदलणे व Turbo Ventilator बसविणेकामी प्राप्त झालेले कोटशनबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग त्यामध्ये नमूद केलेले कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव :** मा. त्रिसदस्य समितीचे २६ जूलै, २०१३ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ५४६ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटल डोमचे पॉलीकार्बोनेट शीट बदलून नविन १० एम. एम. जाडीचे शीट बसविणे तसेच सदर ठिकाणची गरम हवा बाहेर पडण्याचे दृष्टीने सदर डोमला एकुण सहा ठिकाणी Turbo Ventilator बसविणेकामी येणारे अंदाजे अपेक्षित एकुण रुपये ३,८९,०२५/- मात्रचे खर्चास व सदर कामासाठी विहीत पध्दतीने कोटेशन्स् मागविणेस मान्यता मिळालेली आहे.

**प्रस्तावना :** संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलचे नुतनिकरण सन २००६ मध्ये पूर्ण करणेत आलेले आहे. त्यावेळेस हॉस्पीटलचे मध्यवर्ती ठिकाणी व्हेंटीलेशनचे दृष्टीने पॉलीकार्बोनेट शीट वापरुन डोम तयार करणेत आलेला आहे. सदर डोमचे पॉलीकार्बोनेट शीटवर उन, वारा, पाऊस याचा परिणाम होवून शीट कमकुवत झालेले आहे.

**प्रस्ताव :** सदर डोमचे पॉलीकार्बोनेट शीट कमकुवत झाल्याने सदरचे पॉलीकार्बोनेट शीट बदलून नविन १० एम. एम. जाडीचे शीट बसविणे तसेच सदर ठिकाणची गरम हवा बाहेर पडण्याचे दृष्टीने सदर डोमला एकुण सहा ठिकाणी Turbo Ventilator बसविणेसाठी इकडील विभागामार्फत याकामी आयटमरेट कोटेशन तयार करणेत येऊन, याकामी यापूर्वी जुना पिंपळवाडी रस्त्यावरील दर्शनरांग, तसेच महाव्दार नं. १,५ व ३ समोर एम. एस. स्ट्रक्चर वापरुन पॉलिकार्बोनेट शीटचे शेड उभारणीचे कामाचे वेळेस निविदा सादर केलेले तसेच साईप्रसादालय येथील डोम करीता पॉलिकार्बोनेट शीटचे कामाकरीता निविदा सादर केलेले खालील ठेकेदार यांना इकडील जा. नं. ३५२२४/२०१३ दि. ०४ नोव्हेंबर, २०१३ रोजीचे कोटेशन मागणी पत्र देऊन दिनांक ११ नोव्हेंबर, २०१३ ते दिनांक १६ नोव्हेंबर, २०१३ कोटेशनची विक्री ठेवणेत आली होती.

| अ. नं. | नांव | अ. नं. | नांव |
|---|---|---|---|
| ०१. | सिटाडेल आर्किटेक्चल सोल्युशन प्रा. लि., भांडूप, मुंबई | ०६. | ॲल्युमेक्स ग्रुप ऑफ कंपनी, नवी दिल्ली. |
| ०२. | एम. एस. शेल्टर, नाशिक | ०७. | पुजा स्टिल कार्पोरेशन, मुंबई |
| ०३. | रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | ०८. | मिलींद एस. पाचोरकर, निफाड |
| ०४. | मनोज डी. जाधव, सटाणा | ०९. | रेखा इंटरप्राईजेस्, नाशिक |
| ०५. | मकॉय आर्किटेक्चरल सिस्टम प्रा. लि., नवी मुंबई | | |

उपरोक्त ठेकेदारांपैकी खालील ठेकदारांनी विहीत मुदतीत कोरे कोटेशन फॉर्म विकत घेतलेले आहेत.

०१. सिटाडेल आर्किटेक्चल सोल्युशन प्रा. लि., भांडूप, मुंबई
०२. एम. एस. शेंल्टर, नाशिक
०३. रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर
०४. मनोज डी. जाधव, सटाणा
०५. रेखा इंटरप्राईजेस्, नाशिक

वरील ठेकेदारांपैकी अ. नं. ०१ ते ०३ ठेकेदारांनी दिनांक १९ नोव्हेंबर, २०१३ पर्यन्तचे विहीत मुदतीत कोटेशन सादर केले आहे. प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष दि.०९ डिसेंबर २०१३ रोजी उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No | Description | Qty/ Unit | Name of Tenders | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Citadel Architectural Solutions Pvt. Ltd., Mumbai | | Ravindra Rubbar Products & Fabricatior, Shrirampur | | M. S. Shelters, Nashik | |
| | | | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount |
| 1. | Providing and fixing in position 10 mm thk. Multi Wall Poly carbonate sheet in sky light for roofing with wind ties including fastening with gaivanized iron screw and lead and bitumen washers over existing frame work with special alluminium profile and neoprene gasket including sealing the joints with silicon sealant making it fully waterproof etc. complete. | 195 Sqm. | 2346/- | 457470/- | 2270/- | 442650/- | 2095/- | 408525/- |
| 2. | Providing and fixing Wind Operated Ventilation System Size 24″ Diameter with FRP 32″x32″ Sqare base plate Dura alluminium with double exhsust fin 0.5mm thk. | 6 Nos. | 5500/- | 33000/- | 7500/- | 45000/- | 6900/- | 41400/- |
| | Total Amount Rs. | | | 490470/- | | 487650/- | | 449925/- |

उपरोक्त निविदाधारकांना आजचे उपसमिती सभेसमोर चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी चर्चा/ वाटाघाटीअंती खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| Sr. No. | Description | Qty/ Unit | Citadel Architectural Solutions Pvt. Ltd., Mumbai | | Ravindra Rubber Products & Fabrication, Shrirampur | | M. S. Shelters, Nashik | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Quoted rate Rs | Negotiated Rs | Quoted rate Rs | Negotiated Rs | Quoted rate Rs | Negotiated Rs |
| 1. | Providing and fixing Poly carbonate sheet | 195 Sqm. | 4,57,470/- | | 4,42,650/- | | 4,08,525/- | |
| 2. | Providing and fixing Wind Operated Ventilation System | 6 Nos. | 33,000/- | | 45,000/- | | 41,400/- | |
| | Total Amount Rs. | | 4,90,470/- | 4,90,470/- | 4,87,650/- | 4,55,000/- | 4,49,925/- | **4,39,000/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डोमचे पॉलीकार्बोनेट शीट बदलणे व Turbo Ventilator बसविणेकामी मे.एम. एस. शेल्टर, नाशिक यांचे रु.४,३९,०००/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०७ **संस्थानचे वाहन विभागासाठी कार पार्किंग व कर्मचारी वाहन पार्किंग शेड तयार करणेकामी प्राप्त निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थानचे वाहन विभाग गौरी शेडचे पूर्वेकडील संस्थानचे मालकीचे स.नं.१०९ पै. मधिल जागेत स्थलांतरीत करण्यात आले आहे. मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये याठिकाणी इकडील विभागामार्फत वाहनांकरीता शेड्स, वाहन तळाचे खडीकरण व डांबरीकरण करणे, नविन कार्यालय बांधकाम, कार वॉशर रॅम्प, पाण्याची साठवण टाकी, टॉयलेट, स्टोअर रुम, चेनलिंक फेसींग इ. कामे पूर्ण करुन देण्यात आली आहे.

वाहन विभाग प्रमुख यांनी दि.०२/०८/२०१२ रोजीचे पत्रान्वये वाहनांसाठी शेड अपुरे पडत असल्याने कार्यालयासमोरील जागेत कार्यालयीन वाहनांसाठी व कर्मचाऱ्यांचे टु व्हीलर पार्किंगसाठी शेड तयार करणेस विनंती केली आहे. त्यानुसार कार्यालयीन कामांसाठीचे आठ वाहनांसाठी २४.०mx५.५m चे शेड बांधता बांधणेस, तसेच कर्मचाऱ्यांचे टु व्हिलर आठरा वाहन पार्किंगसाठी १८mx३m शेडचे बांधकाम प्रस्तावीत आहे. याकामी सन २०११-२०१२ चे DSR दराने केलेल्या अंदाजपत्रकानुसार रु.८,३५,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षीत होता. शेड साठी टयुबलर सेक्शन स्ट्रक्चर व कलर कोटेड शिट्स गृहीत धरण्यात आलेले आहेत. याकामी येणाऱ्या खर्चास मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१२ रोजीचे सभेत निर्णय क्र. ८०७ अन्वये मान्यता देणेत आली आहे.

याकामी विहीत पध्दतीने निविदा तयार करुन दिनांक ०४/०४/२०१३ रोजीचे दैनिक देशदूत वृत्तपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करणेत आली.

याकामी प्राप्त झालेल्या तिन सिलबंद निविदा मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे उघडून त्यावर निर्णय होणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/१०/२०१३ रोजीचे सभेतील नि.क्र. ७७६ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झाला आहे.

"संस्थानचे वाहन विभागासाठी कार पार्किंग व कर्मचारी वाहन पार्किंग शेड तयार करणेकामी प्राप्त झालेल्या तिन ठेकेदारांच्या सिलबंद निविदांमधील तांत्रिक माहितीचा लिफाफा क्र. १ (टेक्नीकल बीड) आजचे सभेत समक्ष उघडण्यात आला असता, त्यामध्ये तीनही ठेकेदारांनी निविदा सूचना/ जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या Minimum qualifying criteria "The Tenderer should have completed at least single work of similar nature, Costing minimum Rs ४ lakhs, during last ३ financial years, या अटीनुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही.

यावर सविस्तर चर्चा होऊन, त्यामुळे सर्व निविदासादरकर्ते अपात्र ठरत असल्याने सदरहूकामी नव्याने निविदा मागविण्यात याव्या, असे ठरले."

याकामी फेर निविदा मागविणेसाठी दि.२१/१२/२०१३ रोजीचे दैनिंक पुढारी व दैनिक सार्वमत या वृत्तपत्रात निविदा सूचना प्रसिद्ध करणेत आली होती. याकामी सिलबंद निविदा सादर करणेचे दि.०६/०१/२०१४ पर्यंतचे अंतीम मूदतीत खालील ठेकेदार यांनी निविदा जमा केल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | मे. गिरीधर कन्स्ट्रक्शन, सोनेवाडी | १६८७३ | ०६/०१/२०१४ |
| ०२ | मे. रविंद्र रबर प्रोडक्टस् ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | १६८७४ | ०६/०१/२०१४ |
| ०३ | मे. अदील ॲण्ड अरसलन कन्स्ट्रक्शन, लोणी (प्रो.शेख सुलतान नुर महोम्मद) | १६८७२ | ०६/०१/२०१४ |
| ०४ | श्री. मंगेश आर लोढा, शिर्डी | १६८७५ | ०६/०१/२०१४ |
| ०५ | श्री. बाबासाहेब पी. शिंदे, पढेगांव | १६८६८ | ०६/०१/२०१४ |
| ०६ | मे.एन.एस. बनकर पा.कंपनी, श्रीरामपूर | १६८६६ | ०६/०१/२०१४ |
| ०७ | मे.ओम मजुर सहकारी संस्था, औरंगाबाद | १६८६४ | ०६/०१/२०१४ |
| ०८ | श्री.एस.जी. गायकवाड, राहाता | १६८६० | ०६/०१/२०१४ |
| ०९ | मे. साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | १६८७६ | ०६/०१/२०१४ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०९ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | निविदेमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटी अंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे. साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | Does not qualify | अपात्र |
| ०२ | श्री. मंगेश आर लोढा, शिर्डी | ५,५०,४८८/- | ५,३१,२२१/- |
| ०३ | श्री.एस.जी. गायकवाड, राहाता | ५,५५,९९३/- | ५,५०,४८८/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०४ | श्री. बाबासाहेब पी. शिंदे, पढेगांव | ५,६७,००३/- | ५,२८,४६८/- |
| ०५ | मे.एन.एस. बनकर पा.कंपनी, श्रीरामपूर | ५,७८,०१२/- | **५,२२,९६४/-** |
| ०६ | मे. अदील ॲण्ड अरसलन कन्स्ट्रक्शन, लोणी | Does not qualify | अपात्र |
| ०७ | मे. रविंद्र रबर प्रोडक्टस् ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | Does not qualify | अपात्र |
| ०८ | मे.ओम मजुर सहकारी संस्था, औरंगाबाद | ६,६६,०९०/- | ५,३९,४७८/- |
| ०९ | मे. गिरीधर कन्स्ट्रक्शन, सोनेवाडी | ५,३२,३२२/- | अनुपस्थित |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे वाहन विभागासाठी कार पार्किंग व कर्मचारी वाहन पार्किंग शेड तयार करणेकामी मे.एन.एस. बनकर पा.कंपनी, श्रीरामपूर यांचे रु.५,२२,९६४/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**०८ साईप्रसाद क्र.०१ दक्षिण बाजूस असलेल्या सबस्टेशन भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी प्राप्त निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

विद्युत विभागाचे दि.०८/०९/२०१२ रोजीचे पत्रान्वये साईप्रसाद क्र. १ चे दक्षिण बाजुस असलेल्या सबस्टेशन व जनरेटर रुमसमोर भर टाकून पेव्हींग ब्लॉक बसविणे तसेच त्या अनुषंगाने तेथील चेंबर्सची उंची वाढविणे. तसेच वर्कशॉपच्या पूर्व बाजूस मातीचा भाग असल्याने तेथे उंदीर, घुशी उकीर काढतात त्यामुळे त्याठिकाणी पी.सी.सी. करुन पेव्हींग ब्लॉक बसवून मिळावे असे कळविले होते.

याकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१३ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर केला होता. सदरहू सभेतील नि.क्र.१० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत करणेत आला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसाद क्र.०१ चे दक्षिण बाजूस असलेल्या जनरेटर रुम आणि सबस्टेशनकरीता सिव्हील वर्कचे कामाकरीता विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून काम करुन घेणेस व याकामी येणारे रु.३,७१,७००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली".

सदरहू सबस्टेशन भोवती ब्लॉक बसविणेसाठी निविदा मागविणेकामी दि.१६/०१/२०१४ रोजीच्या दैनिक सार्वमत मधे निविदा सूचना प्रसिद्ध करणेत आली होती. सिलबंद निविदा जमा करणेचे दि.३०/०१/२०१४ पर्यंतचे अंतिम मूदतीत खालील पाच ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१. | साई नॅचरल स्टोन, शिर्डी | १८३६४ | ३०/०१/२०१४ |
| ०२. | एस.जी. गायकवाड, राहाता | १८४०६ | ३०/०१/२०१४ |
| ०३. | साईदिप पेव्हर्स, निमगांव | १८३६३ | ३०/०१/२०१४ |
| ०४. | मांडे रोहन श्रीकांत, अ.नगर | १८३५२ | ३०/०१/२०१४ |
| ०५. | बी.पी. शिंदे, पढेगांव | १८४०७ | ३०/०१/२०१४ |

तरी उपरोक्तप्रमाणे प्राप्त सिलबंद निविदा मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे उघडून ठेकेदार यांचेसमवेत चर्चा वाटाघाटीव्दारे निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसर व जुने प्रसादालय परिसर पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येणार असल्याने साईप्रसाद क्र.०१ दक्षिण बाजूस असलेल्या सबस्टेशन भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम करणेत येऊ नये व याकामी आलेल्या निविदा रद्द करणेत याव्या, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**०९ श्री साईप्रसादालय इमारत पहिला मजला येथील माहिति तंत्रज्ञान विभागाचे हॉलमध्ये वर्कस्टेशन फर्निचर बनविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प कार्यान्वीत आहे. संस्थानचे नविन श्री साई प्रसादालयातील पहिल्या माळ्यावरील उत्तरेकडील हॉलमधे सध्या डाटा सेंटर व माहिती तंत्रज्ञान विभागाचे कार्यालय करणेत आले आहे. सदर ठिकाणी संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागाचे कर्मचारी व कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे कर्मचारी यांचेकरीता दैनंदीन कामासाठी २० वर्कस्टेशन यापुर्वी खरेदी करणेत आलेले आहे. माहिती तंत्रज्ञान विभागाने दि.०३/१०/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये सदर ठिकाणी सध्याची बैठक व्यवस्था अपूर्ण पडत असून आणखी २० कर्मचाऱ्यांकरीता वर्कस्टेशन करावेत अशी विनंती केली आहे.

दि. १३/१२/२०१३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.त्रीसदस्य समितीचे सभेतील चर्चेअन्वये विषयांकीत कामासाठी रु.६,००,०००/- मात्रचे खर्चास तसेच सदरचे काम करणेसाठी विहित पध्दतीने कोटेशन्स मागवून काम करणेसाठी मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार सदरहू कामी दि.१५/०१/२०१४ रोजीचे दैनिक पुढारी व दैनिक सार्वमत मध्ये निविदा जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती.

दि.२७/०१/२०१४ पर्यंत सिलबंद निविदा सादर करणेचे अंतिम मूदतीत खालील तिन ठेकेदारांच्या सिलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव | आवक क्रमांक / दिनांक |
|---|---|---|
| ०१ | रोहन खंडेलवाल, अहमदनगर | १८१९७/ दि.२७/०१/२०१४ |
| ०२ | टेक्सास लाईफस्टाईल फर्निचर प्रा.लि., औरंगाबाद | १८१९९/ दि.२७/०१/२०१४ |
| ०३ | फेनीक्स किचन प्रा.लि., नाशिक | १८२०१/ दि.२१/०१/२०१४ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | निविदेमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटी अंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | रोहन खंडेलवाल, अहमदनगर | ९,०४,०००/-<br>LBT Extra installation<br>१५००० extra | अनुपस्थित |
| ०२ | टेक्सास लाईफस्टाईल फर्निचर प्रा.लि., औरंगाबाद | ३,९५,४२८/- | ३,८७,५६८/- |
| ०३ | फेनीक्स किचन प्रा.लि., नाशिक | ४,५१,०००/- | ४,५०,०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय इमारत पहिला मजला येथील माहिती तंत्रज्ञान विभागाचे हॉलमध्ये वर्कस्टेशन फर्निचर बनविणेकामी मे.टेक्सास लाईफस्टाईल फर्निचर प्रा.लि., औरंगाबाद यांचे रु. ३,८७,५६८/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१० **साईबाबा भक्तनिवास (५०० रुम) येथील कार्यालयाचे नुतनीकरणकरिता ग्रीलचे काम करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

मा.त्रीसदस्य समितीचे दि.२६-०७-२०१३ चे सभेतील विषय क्र.५१ निर्णय क्र.५८०अन्वये साईबाबा भक्तनिवास (५०० रुम) येथील कार्यालयाचे नुतनीकरणकरिता ग्रीलचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३९,६००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस/ विद्युत /४५८३/ २०१४ दि.०६-०१-२०१४ अन्वये बाहेरील १० फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन्स मागविण्यात आलेली आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन्स प्राप्त झाली आहेत.कोटेशनचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कोटेशनधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.सुपर ॲग्रो इंडस्ट्रीज, गणेशनगर |
| ०२) | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता. |
| ०३) | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव |

उपरोक्तप्रमाणे साईबाबा भक्तनिवास (५०० रुम) येथील कार्यालयाचे नुतनीकरणाकरिता ग्रीलचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स /वर्कशॉपधारकांकडून करुन घेणेकामी प्राप्त झालेली ०३ सिलबंद कोटेशन्स आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, कोटेशन्सधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटी अंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.सुपर ॲग्रो इंडस्ट्रीज, गणेशनगर | ५९,४००/- | अपात्र |
| ०२ | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता. | ५५,६८७/- | अनुपस्थित |
| ०३ | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | ५१,९७५/- | **४५,०००/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवास (५०० रुम) येथील कार्यालयाचे नुतनीकरणकरिता ग्रीलचे काम करणेकामी मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव यांचे रु.४५,०००/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

११ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन खरेदीसाठी प्राप्त झालेले कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता मा.व्यवस्थापन सभा दिनांक १०/१०/२०१० चे निर्णय क्र.७५५ अन्वये इकडील पत्र क्र.६१३६ दि.१०/०१/२०११ अन्वये मे.केसीएम इंटरनॅशनल, जयपुर यांचेकडुन खरेदी केले होते.

सदरचे लिनन तीन वर्षापुर्वी खरेदी करण्यात आलेले होते त्यातील लिनन वापरुन सध्या खराब झालेले आहे व ते वापरण्याचे स्थितीत नाही त्यामुळे दैनंदिन वापरासाठी लागणारे काही लिनन मागील वर्षी त्याच मंजुर दराने मे.केसीएम इंटरनॅशनल, जयपुर यांचेकडुन मा.त्रिसदस्य समिती सभा दि.१८/०७/२०१२ नि.क्र. ५८६ अन्वये ड्रॉशीट, पेशंट ड्रेस, ओ.टी.असिस्टंट ड्रेस, व सर्जन गाऊन इत्यादी एकुण रु.२,४६,६४७/ चे लिनन यांचेकडुन इकडील पत्र क्र.२४५४ दि.१०/०८/२०१२ अन्वये मागील मंजुर दराने तात्पुरते खरेदी केले होते.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणाऱ्या वार्षीक लिनन खरेदीचा वार्षीक प्रस्ताव एकत्रीत तयार करणेत आलेला आहे व त्याकरीता अंदाजे रु.४८,८७,९१६/-इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर प्रस्ताव मा.त्रिसदस्य समीती सभेपुढे ठेवण्यात येत आहे. परंतु सदर लिनन उपलब्ध होणेस बराच वेळ लागु शकतो त्यामुळे कामाची दैनंदिन गैरसोय होऊ नये म्हणुन श्री साईबाबा रुग्णालयाकरीता खालीलप्रमाणे लिनन तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालयाला देखील लिनन कमी पडत असल्याने त्यांनी देखील डि.पी.नं.२५४६ दि.२८/०८/२०१३ अन्वये लिनन करीता मागणी केली आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशील | आवश्यक साईज | आवश्यक रंग | लिनन विभागातील शिल्लक साठा नगात | श्री साईबाबा हॉस्पीटल आवश्यक मागणी नगात | श्री साईनाथ रुग्णालय आवश्यक मागणी नगात | एकुण आवश्यक नग | प्रती नग अंदाजे दर रु./पै | अंदाजे खर्च रु./पै |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ड्रॉ शीट | ७५"x४५"इंच | ग्रीन | २० नग | २०० | २०० | ४०० | ११८.०० | ४७२००.०० |
| २ | होलशीट | ७५"x४५"इंच | ग्रीन | ९१ नग | २०० | -- | २०० | १२८.०० | २५६००.०० |
| ३ | सर्जन ड्रेस | S/M/L/XL | स्काय ब्ल्यु | ०३ नग | १०० | ५० | १५० | २०८.०० | ३१२००.०० |
| ४ | ओ.टी.असिस्टंट ड्रेस | S/M/L/XL | नेव्ही ब्ल्यु | ३८ नग | १०० | ५० | १५० | २०८.०० | ३१२००.०० |
| ५ | सर्जन गाऊन | Large | ग्रीन | १३२ नग | १०० | -- | १०० | २२७.०० | २२७००.०० |
| ६ | सर्जन गाऊन (Imperious material) | Large | ग्रीन | Nill | १०० | -- | १०० | २२७.०० | २२७००.०० |
| ७ | आयशीट | २०"x२०"इंच | ग्रीन | Nill | -- | १०० | १०० | ३२.०० | ३२००.०० |
| ८ | ओ.टी.स्टाफ ड्रेस | S/M/L/XL | ग्रे | २५८ नग | -- | ५० | ५० | २०८.०० | १०४००.०० |
| ९ | मास्क | | ग्रीन | Nill | २०० | -- | २०० | २०.०० | ४०००.०० |
| | | | | | | | | **एकुण रु.** | **१,९८,२००.००** |

उपरोक्त लिनन खरेदी करणे आवश्यक असल्याने खरेदीस अंदाजे रु.१,९८,२००/- इतका खर्च अपेक्षीत आहे. तरी सदरचे लिनन विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेचे प्रस्तावास मा.त्रिसदस्य समिती सभा दि.०८/१०/२०१३ निर्णय क्र.७२५ अन्वये मान्यता मिळाली आहे त्यानुसार इकडील पत्र क्र.४०१६ दि.२५/१०/२०१३ अन्वये एकुण ११ पुरवठा धारकांना दि.२१/०११/२०१३ अखेर कोटेशन पाठविण्याचे पत्र दिले होते.

दिनांक २१/११/२०१३ अखेर खालीलप्रमाणे एकुण ४ पुरवठाधारकांचे बंद कोटेशन प्राप्त झाले आहे, त्यापैकी अ.नं.१,२ यांचे कोटेशन वेळेत प्राप्त झाले आहेत. व अ.नं.३ हे कोटेशन दिनांक २५/११/२०१३ रोजी एक कोटेशन उशीरा प्राप्त झाले आहे, व अ.नं.४ यांचे कोटेशन ई-मेलव्दारा प्राप्त झाले आहे. तीन कोटेशन हे बंद स्थितीत आहे. परंतु जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळण्याचे दृष्टिने उशीरा प्राप्त झालेले कोटेशनही विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | प्राप्त स्थिती | प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मे.वेदांत एन्टरप्रायजेस,सोलापुर | बंद स्थिती | १९/११/२०१३ |
| २ | मे.अनुराग मेडीकल अॅन्ड सर्जिकल, पुणे | बंद स्थिती | २०/११/२०१३ |
| ३ | मे.जयहिंद कलेक्शन, अहमदनगर | बंद स्थिती | २५/११/२०१३ |
| ४ | मे.केसीएम इंटरनॅशनल, जयपुर | ई-मेल व्दारा | ०३/१२/२०१३ |

उपरोक्त ०३ बंद कोटेशन आजचे उपसमिती सभेपुढे उघडण्यात आले. तसेच चारही कोटेशनधारकांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | तपशील | मे.जयहिंद कलेक्शन, अहमदनगर | | मे.केसीएम इंटरॉशनल, जयपुर | | मे.अनुराग सर्जिकल्स, पुणे | | मे.वेदांत एंटरप्रायजेस, सोलापुर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कोटेशन मधील दर व्हॅटसह रु./पै. | चर्चा/ वाटाघाटी नंतरचे दर व्हॅटसह रु./पै. | कोटेशन मधील दर व्हॅटसह रु./पै. | चर्चा/ वाटाघाटी नंतरचे दर व्हॅटसह रु./पै. | कोटेशन मधील दर व्हॅटसह रु./पै. | चर्चा/ वाटाघाटी नंतरचे दर व्हॅटसह रु./पै. | कोटेशन मधील दर व्हॅटसह रु./पै. | चर्चा/ वाटाघाटी नंतरचे दर व्हॅटसह रु./पै.. |
| १ | ड्रॉ शीट ७५"x४५"इंच ग्रीन ४०० नग | २३२.०० | २२५.०४ | १७५.५१ | १७३.७५ | २९०.०० | २६१.०० | १७८.५० | १८३.७५ |
| २ | होलशीट ७५"x४५"इंच ग्रीन २०० नग | २३६.०० | २२८.९२ | १८६.०१ | १८४.१४ | ३१०.०० | २७९.०० | १८३.७५ | १९०.०५ |
| ३ | सर्जन ड्रेस S/M/L/XL स्काय ब्ल्यु १५० नग | ३४४.०० | ३२६.८० | २८६.६५ | २८३.७८ | ४३०.०० | ३८७.०० | ३७२.७५ (अशोका) | ३५९.१० |
| | | | | | | | | ४१४.७५ (रॉयली) | |
| ४ | ओ.टी.असिस्टंट ड्रेस S/M/L/XL नेव्ही ब्ल्यु १५० नग | ३४४.०० | ३२६.८० | २८६.६५ | २८३.७८ | ४३०.०० | ३८७.०० | ३७२.७५ | ३५९.१० |
| | | | | | | | | ४१४.७५ | |
| ५ | सर्जन गाऊन Large ग्रीन १०० नग | ३२४.०० | ३०७.८० | २३३.७३ | २३१.३९ | ४२०.०० | ३७८.०० | ३५७.०० | ३१५.०० |
| ६ | सर्जन गाऊन (Imperious material) Large ग्रीन १०० नग | ३७६.०० | ३५७.२० | ३०८.७० | ३०५.६१ | ५२०.०० | ४६८.०० | ३७८.०० | ३४६.५० |
| ७ | आयशीट २०"x२०" इंच ग्रीन १०० नग | ३८.०० | ३६.८६ | ३५.२८ | ३४.९२ | ७५.०० | ६७.५० | ७३.५० | ७१.४० |
| | ३"x३" इंच ब्ल्यु | | | | | | | | |
| ८ | ओ.टी.स्टाफ ड्रेस S/M/L/ XL ग्रे ५० नग | ३४०.०० | ३२३.०० | २८६.६५ | २८३.७८ | ४३०.०० | ३८७.०० | ३७२.७५ (अशोका) | ३७२.७५ |
| | | | | | | | | ४१४.७५ (रॉयली) | ४१४.७५ |
| ९ | मास्क ग्रीन २०० नग | १८.०० | १७.१० | १२.७८ | १२.६५ | २०.०० | १८.०० | १३.६५ | ११.५५ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकिय संचालक यांनी प्रथमत : पुरवठाधारकांकडून प्राप्त झालेल्या कपडयांच्या नमुन्यांची पाहणी करावी व त्यानंतर प्रस्तावित खरेदीबाबत निर्णय घ्यावा, तसेच याकामी येणाऱ्या अपेक्षित वाढीव खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१२ **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वॉर्ड व बिलींग करीता फॉर्म व केसपेपर छपाई करणेकामी प्राप्त दरपत्रके उघडून चर्चा/ वाटाघाटी करून निर्णय घेणे.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील अधिसेविका कार्यालय व बिलींग विभागाकरिता लागणारे फॉर्म व केसपेपर छपाई करणेकामी मा. त्रिसदस्य समिती सभा दि.१३.१२.२०१३ चे सभेत विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन छपाई करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. १,३४,६५०/- चे खर्चास व छपाईस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे छपाई कामी इकडील पत्र क्र. ६०९१ दि. ३०.१२.२०१३ अन्वये १८ पुरवठा धारकांकडून सिलबंद कोटेशन दि. ११.०१.२०१४ अखेर मागवण्यात आले होते. त्यास अनुसरुन एकूण १० कोटेशन प्राप्त झाले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | आवक नंबर | कोटेशन प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मे. क्लासीक ऑफसेट, श्रीरामपूर | ४७९४ | बंद स्थितीत प्राप्त दि.०४.०१.२०१४ |
| २ | मे. पवन ऑफसेट, कोपरगांव | ४७९५ | बंद स्थितीत प्राप्त दि. ०४.०१.२०१४ |
| ३ | मे. साई एंटरप्रायजेस, कोपरगांव | ४७९६ | बंद स्थितीत प्राप्त दि. ०४.०१.२०१४ |
| ४ | मे. साईकिरण ऑफसेट प्रिंटर्स, बाभळेश्वर | ४८४० | बंद स्थितीत प्राप्त दि.०७.०१.२०१४ |
| ५ | मे. रोहन प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद | ४८६३ | बंद स्थितीत प्राप्त दि.०९.०१.२०१४ |
| ६ | मे. प्रभात ऑफसेट, येवला | ४९०८ | बंद स्थितीत प्राप्त दि.१०.०१.२०१४ |
| ७ | मे. गजानन ऑफसेट, चांदवड | ४९०९ | बंद स्थितीत प्राप्त दि.१०.०१.२०१४ |
| ८ | मे. प्रिंटवेल प्रिंटर्स, मालेगांव | ४९११ | बंद स्थितीत प्राप्त दि.१०.०१.२०१४ |
| ९ | मे. श्री ग्राफी , पुणे | ३६३५ | ई - मेल द्वारे प्राप्त दि. ११.०१.२०१४ |
| १० | मे. अविराज पॅकवेल, कोपरगांव | ४९२६ | बंद स्थितीत प्राप्त दि.११.०१.२०१४ |

उपरोक्त पैकी अ.नं. ३ व ४ हे कोटेशन सदर पुरवठा धारकांनी येथे येऊन स्वत:हून दिलेले आहे. तसेच अ.नं. ९ हे कोटेशन ई-मेल द्वारे प्राप्त झालेले आहे. परंतु जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळण्याच्या दृष्टीने तीनही कोटेशन विचारात घ्यावे असे मत आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०९ बंद कोटेशन आजचे उपसमिती सभेपुढे उघडण्यात आले. तसेच सर्व कोटेशनधारकांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, खालील कोटेशनधारक सभेसमोर उपस्थित होते व त्यांनी तक्त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे मुळ दरामध्ये सुट देऊ केली.

| अ. नं. | तपशिल | उपस्थित / अनुपस्थित | मुळदरावर दिलेली सुट |
|---|---|---|---|
| १ | मे. क्लासीक ऑफसेट, श्रीरामपूर | उपस्थित | ३ % |
| २ | मे. पवन ऑफसेट, कोपरगांव | उपस्थित | ५ % |
| ३ | मे. साई एंटरप्रायजेस, कोपरगांव | उपस्थित | ७ % |
| ४ | मे. साईकिरण ऑफसेट प्रिंटर्स, बाभळेश्वर | अनुपस्थित | ०० |
| ५ | मे. रोहन प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद | अनुपस्थित | ०० |
| ६ | मे. प्रभात ऑफसेट, येवला | उपस्थित | १ % |
| ७ | मे. गजानन ऑफसेट, चांदवड | अनुपस्थित | ०० |
| ८ | मे. प्रिंटवेल प्रिंटर्स, मालेगांव | उपस्थित | ६ % |
| ९ | मे. श्री ग्राफी , पुणे | अनुपस्थित | ०० |
| १० | मे. अविराज पॅकवेल, कोपरगांव | उपस्थित | ५ % |

त्यांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ. नं. | तपशील | साईज व कागद प्रकार | मागणी | मुळ दर प्रति नग सर्व करांसह रु. पै. | चर्चा/वाटाघाटी नंतर चे दर प्रति नग सर्व करांसह रु. पै. |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **कंटयुनिएशन शीट** | **A४ साईजचे, ७०gsm मॅपलिथो पेपरवर पाठपोट छपाई** | **२०० पॅड** | | |
| - | **मे. अविराज पॅकवेल, कोपरगांव** | **A४ साईजचे, ७०gsm मॅपलिथो पेपरवर पाठपोट छपाई** | **२००पॅड** | **५३.५०** | **५०.८३** |
| | मे. क्लासीक ऑफसेट, श्रीरामपूर | A४ साईजचे, ७०gsm मॅपलिथो पेपरवर पाठपोट छपाई | २०० पॅड | ५२.५० | ५०.९३ |
| | मे. साई एंटरप्रायजेस, कोपरगांव | A४ साईजचे, ७०gsm मॅपलिथो पेपरवर पाठपोट छपाई | २०० पॅड | ५६.०० | ५२.०८ |
| | मे. रोहन प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद | A४ साईजचे, ७०gsm मॅपलिथो पेपरवर पाठपोट छपाई | २०० पॅड | ५४.०० | ५४.०० |
| | मे. साईकिरण ऑफसेट प्रिंटर्स, बाभळेश्वर | A४ साईजचे, ७०gsm मॅपलिथो पेपरवर पाठपोट छपाई | २०० पॅड | ५५.०० | ५५.०० |
| | मे. प्रिंटवेल प्रिंटर्स, मालेगांव | A४ साईजचे, ७०gsm मॅपलिथो पेपरवर पाठपोट छपाई | २०० पॅड | ६०.०० | ५६.४० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मे. पवन ऑफसेट, कोपरगांव | A४ साईजचे, ७०gsm मॅपलिथो पेपरवर पाठपोट छपाई | २०० पॅड | ६०.०० | ५७.०० |
| | मे. गजानन ऑफसेट, चांदवड | A४ साईजचे, ७०gsm मॅपलिथो पेपरवर पाठपोट छपाई | २०० पॅड | ६१.०० | ६१.०० |
| | मे. श्री ग्राफी , पुणे | A४ साईजचे, ७०gsm मॅपलिथो पेपरवर पाठपोट छपाई | २०० पॅड | ७३.५० | ७३.५० |
| | मे. प्रभात ऑफसेट, येवला | A४ साईजचे, ७०gsm मॅपलिथो पेपरवर पाठपोट छपाई | २०० पॅड | ७८.०० | ७७.२२ |
| **२** | **प्रिस्क्रीप्शन पॅड मोठे** | **१/८ साईजचे, ७०gsm मॅपलिथो पेपरवर छपाई** | **२०० पॅड** | | |
| - | **मे. अविराज पॅकवेल, कोपरगांव** | **१/८ साईजचे, ७०gsm मॅपलिथो पेपरवर छपाई** | **२०० पॅड** | **२३.००** | **२१.८५** |
| | मे. प्रभात ऑफसेट, येवला | १/८ साईजचे, ७०gsm मॅपलिथो पेपरवर छपाई | २०० पॅड | २३.०० | २२.७७ |
दि.२५.०५.२०१३ पासून महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र.५ अन्वये टोन्ड गाय दुधाचे खरेदी दरात प्रति लिटर रु.२/- मात्र वाढ केल्याने श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स,तिसगाव यांनी दि.१७.०६.२०१३ रोजीचे पत्रान्वये दि.२५.०५.२०१३ पासून टोन्ड गाय दुधामध्ये प्रति लिटर रु.२/- दरवाढ मागितलेली होती. त्याबाबत त्यांनी महाराष्ट्र शासनाकडील निर्णयाची प्रत सादर केलेली होती. सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७.०९.२०१३ चे सभेत सादर केला असता, त्यावर निर्णय क्र.६९४ पुढीलप्रमाणे समंत झालेला आहे. श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स यांची गाय दूध दरात वाढ मिळणेबाबतची विनंती अमान्य करणेत आली. त्याबाबत इकडील जा.क्र.३२७७/२०१३ दि.२१.१०.२०१३ अन्वये सबंधीत पुरवठाधारक श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांना कळविण्यात आलेले आहे.

त्यानंतर मे.स्वामी समर्थ डिस्टीब्युटर्स, तिसगांव यांनी त्यांचेकडील दि.२१.१०.२०१३ अन्वयेचे पत्राने महाराष्ट्र शासनाचे निर्णय क्र. एमएलके २०१३/प्र.क्र.४५/पदुम ८ दि.२२ मे २०१३ अन्वये दि.२५.०५.२०१३ ते दि.२४.०६.२०१३ पर्यंत दुधाचे खरेदी दरात प्रति लिटर रु.२/- मात्र दरवाढ देणेबाबत फेर विचार करणेबाबत विनंती केलेली होती. सदरचा दरवाढ देणेबाबत व दरवाढीच्या फरकाची रक्कम रु.२,३५,१२०/- मात्र आदा करणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०१.२०१४ रोजीचे सभेत फेर सादर केला असता, सदरची विषयावर निर्णय झालेला नाही.

त्यानंतर श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांनी त्यांचेकडील दि.३१.०१.२०१४ रोजीचे पत्रामध्ये "महाराष्ट्र शासनाचे निर्णय क्र. एमएलके २०१३/प्र.क्र.४५/पदुम ८ दि.२२ मे २०१३ अन्वये दि.२५.०५.२०१३ ते दि.२४.०६.२०१३ पर्यंत दुधाचे खरेदी दरात प्रति लिटर रु.२/- मात्र दरवाढ देणेबाबत पुन्हा विनंती केलेली आहे, तसेच मा.अध्यक्ष सो. यांची दि.१७.०१.२०१४ रोजी नगर येथे समक्ष भेट घेऊन त्यांना देखील दुध दरवाढीची माहिती दिली असता, त्यांनी दुध दरवाढ बरोबर आहे, तरी येत्या मिटींगमध्ये तुमच्या दरवाढीचा विषय निकाली काढू असे सांगितले," असे पत्रात नमुद केलेले आहे.

मे.स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांचे दि.३१.०१.२०१४ रोजीचे पत्रामध्ये नमुद केलेप्रमाणे त्यांनी मागणी केलेप्रमाणे दि.२५.०५.२०१३ ते दि.२४.०६.२०१३ पर्यंत दुधाचे खरेदी दरात प्रति लिटर रु.२/- मात्र (१,१७,५६० लिटर) प्रमाणे दरवाढ दिल्यास त्यांचे दरवाढीच्या फरकाची रक्कम रु.२,३५,१२०/- मात्र होत आहे.

सन २०१२-१३ चे माहे नोव्हें-१२ ते मार्च-१३ चे दुध खरेदीमध्ये मे.स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांनी दि.३१.०१.२०१४ रोजीचे पत्रामध्ये नमुद केलेप्रमाणे त्यांनी मागणी केलेप्रमाणे दि.२५.०५.२०१३ ते दि.२४.०६.२०१३ पर्यंत दुधाचे खरेदी दरात प्रति लिटर रु.२/- मात्र प्रमाणे दरवाढ देणेस व त्या अनुषंगाने दरवाढीच्या फरकाची रक्कम रु.२,३५,१२०/- (अक्षरी रुपये दोन लाख पस्तीस हजार एकशे वीस) मात्र त्यांना आदा करणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१५६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.०६ सुरक्षा साहित्यांचे Comprehensive AMC कॉन्ट्रॅक्ट मे.व्हेन्टेज इंटिग्रेटड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोएडा यांना देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८/१०/२००८ चे सभेतील विषय नं.३६, निर्णय क्र.७९३ नुसार समाधी मंदीर व मंदीर परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने करावयाच्या विविध उपाययोजना व अत्याधुनिक सुरक्षा साहित्याचे खरेदीस व त्याकामी येणारे रु.४.५ कोटीचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०३/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८३ नुसार मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी नोईडा यांची सुरक्षा साहित्य पुरविणेबाबत निवड झालेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१० चे सभेतील निर्णय क्र.५८४ नुसार सदरील सुरक्षा साहित्याचा दर्जा, गुणवत्ता, पुरवठा आदेशानुसार तपासणे, साहित्याची देखरेख व सुपरविजन करणेसाठी पुढील पाच वर्षासाठी ट्रायकलर कन्सलटंट, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

जा.नं.एसएसएस/वशी-संरक्षण/५९५८/२०१० दि.१४/०४/२०१० ने मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सो. कंपनी, नोईडा यांना सुरक्षा साहित्य पुरविणे व इन्स्टॉलेशन करुन देणेकामी वर्क ऑर्डर दिलेली आहे.

तसेच मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी नोईडा यांनी दि.०४/०९/२०१३ चे पत्राने पुढील कालावधीकरीता सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट मिळणेकामी पत्र दिलेले आहे.

वर्कऑर्डरमधील मे.व्हेन्टेज इंटिगेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोइडा यांनी पुरवठा करुन कार्यान्वीत केलेल्या सुरक्षा साहित्यापैकी Annexure-A तपशिलाप्रमाणे साहित्याची Comprehensive AMC देणे आवश्यक आहे. First Work Order मधील रक्कम रुपये

३,२७,३३,०८२/- मात्र व Second work Order मधील रक्कम रुपये २५,१०,४९५ एकुण रक्कम रुपये ३,५२,४३,५७७ /- मात्र इतकी आहे.

तसेच Annexure-B सुरक्षा साहित्य कार्यान्वित करणेकामी केलेले फर्निचर, इन्स्टॉलेशन व कमिशनींग, मॅनेजमेंट खर्च, सिक्युरिटी इक्वीपमेंट गायडन्स खर्च, ट्रेनींग व हॅण्डओव्हर, इंजिनियर पगार, सर्व्हीस टॅक्स, व्हीडीओ लायसन्स, सॉफ्टवेअर इत्यादी करीता झालेला खर्च Comprehensive AMC मध्ये येत नाही. Annexure-B चा तपशिलाप्रमाणे First Work Order मधील रक्कम रुपये ५६,९१,६००/- मात्र व Second work Order मधील रक्कम रुपये २२,६६,०००/- एकुण रक्कम रुपये -७९,५७,६००/- मात्र इतकी आहे.

मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोईडा यांना वर्कऑर्डर देतांना वर्क ऑर्डरमधील मुद्दा क्र.५६ नुसार प्रोजेक्ट पुर्ण झाल्यानंतर व्हेन्टेज यांचेकडून ०१ क्वॉलीफाईड इंजिनीयर व त्यांचे सोबतीला ४ टेक्निकल व्यक्ती २ वर्षाकरीता साईडवर मेन्टेनंन्सचे काम करणेकरीता पुरविणेबाबत देणेचे ठरलेले आहे. त्याकामी मे.व्हेन्टेज यांना दोन वर्षाकरीता रक्कम रु.२८,५८,९७६/- सर्व करांसह देण्याचे ठरलेले होते.

तसेच मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोईडा व संस्थानमध्ये झालेल्या कराराचे मुद्दा क्र.१२ नुसार प्रोजेक्ट पुर्ण झालेचे तारखेपासून दोन वर्षाकरीता सुरक्षा साहित्याची गॅरंटी/ वॉरंटी देण्यात आलेली आहे. व्हेन्टेज यांनी प्रोजेक्ट पुर्ण व कार्यान्वित करुन दि.१०/१०/२०११ रोजी संस्थानकडे हस्तांतरीत केलेला आहे. दि.१०/१०/२०११ पासून दोन वर्षाकरीता मे.व्हेन्टेज यांचा दोन वर्षाचा वॉरंटी/ गॅरंटीचा कार्यकाल हा दि.०९/१०/२०१३ रोजी संपुष्टात आला आहे. सुरक्षा साहित्य उभारणी व दोन वर्षाचे दुरुस्ती/ देखभालीचे काम मे. व्हेन्टेज यांनी केलेले असलेमुळे पुढील दोन/ चार वर्ष कालावधीसाठी त्यांना मेन्टेनंन्सचे काम देणे योग्य राहील असे नम्र मत आहे. त्यासाठी मे.व्हेन्टेज यांनी संदर्भ क्र.५ नुसार पुढील दोन/ चार वर्षाचे कालावधीसाठी दुरुस्ती/ देखभाल, तसेच इंजिनियर एका इंजिनियरसाठी वार्षिक वेतन खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

**(अ)** Comprehensive Annual Maintenance Contract (AMC) मिळणेबाबत व्हेन्टेज यांचे मागणी प्रमाणे AMC कॉन्ट्रॅक्ट देणे झाल्यास खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| **अ.नं.** | **तपशील** | **रक्कम** |
|---|---|---|
| ०१. | एकुण प्रोजेक्ट किंमत | ४,५०,०१,१७७.०० |
| ०२. | AMC न देण्याच्या सुरक्षा साहित्याची किंमत | ७९,५७,६००.०० |
| ०३. | AMC देण्याच्या सुरक्षा साहित्याची किंमत | ३,५२,४३,५७७.०० |
| ०४. | प्रोजेक्ट किंमतीच्या १५% | ५२,८६,५३६.५५ |
| ०५. | सर्व्हीस टॅक्स १२.३६% | ६,५३,४१५.९१ |
| | **एकुण देय्य रक्कम** | **५९,३९,९५२.४६** |
| | **पुर्णांकित रक्कम रु.** | **५९,३९,९५२.००** |

**(ब)** एक इंजिनियरकरीता एका वर्षासाठी रु.३,५०,०००/- + १२.३६% (४३,२६०/-) असे एकूण रु.३,९३,२६०/- खर्च येणार आहे. मेन्टेनंन्सचे कामाकरीता असे दोन इंजिनियर घेणे झाल्यास एक वर्षाकरीता रु.७,८६,५२०/- खर्च येणार आहे.

**त्यानुसार...**

सदरचा विषय मा त्रिसदस्य समितीचे सभेमध्ये दि १४.११.२०१३ रोजी विषय नं.०६ वर चर्चा होऊन निर्णय क्रं.८९५ घेण्यात आलेला आहे व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी,नोईडा हे दोन वर्षापासून करीत असलेल्या कामाचा अहवाल तयार करणेत यावा व सदरच्या सिस्टीममधील स्पेअर पार्ट किती वेळा नादुरुस्त झाले व त्यानंतर त्याची किती वेळामध्ये दिवसामध्ये दुरुस्ती /बदली करणेत आली, बॅग्स स्कॅनर दोन महिन्यांपासून बंद आहे, त्याचा करारानुसार किती कालावधी वाढतो याचा समावेश अहवालात असावा तसेच याबाबत महाराष्ट्र शासनाच्या असलेल्या अटी/शर्तींची व दरांची माहिती घेण्यात येऊन, सदर सिस्टीमच्या मेंटेनन्सचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत सविस्तर प्रस्ताव पुढील सभेपुढे सादर करणेत यावा असे ठरले.

याकरीता कंपनीने सिस्टीमधील स्पेअरपार्ट, सॉप्टवेअर वेळोवेळी दुरुस्ती केलेली आहे. याबाबतचा सविस्तर रिपोर्ट जोडलेला आहे.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं.६ व त्यावरील निर्णय क्रं.८९५ अन्वये याबाबत संस्थानचे सुरक्षा कन्सल्टंट जनरल श्री तैज कौल, ट्रायकलर यांचे मार्फत Comprehensive AMC बाबतचा अभिप्राय घेणेसाठी त्यांना पत्राद्वारे बोलविले असता ते दि.१३.१२.२०१३ रोजी मा.का.अधिकारी सो, संरक्षण अधिकारी, कंट्रोलरुम येथील तांत्रिक सुपरवायझर यांचे समवेत मिटींग झाली असता याबाबतचा सविस्तर रिपोर्ट लवकरच देण्यात येईल असे सांगितले. परंतु त्यांना वेळोवेळी

दुरध्वनीद्वारे संपर्क साधला असता त्यांनी अद्याप पर्यंत Comprehensive AMC बाबतचा अभिप्राय/अहवाल सादर केलेला नाही.

कंट्रोलरुम येथील सिस्टीम मधील तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे तसेच सर्व सुरक्षा साहित्यांची वॉरंटी संपुष्टात आलेली असल्यामुळे सुरक्षा साहित्यांची Comprehensive AMC वाढवून घेणे अत्यंत आवश्यक आहे.त्यामुळे मा.कार्यकारी अधिकारी साो यांचे सुचनेनुसार ट्रायकलर कन्सल्टंट याचा अभिप्राय आलेला नसल्याने तसेच ते तांत्रिक अडचणीचे वेळी शिर्डी येथे भेट देऊन तपासणी करीत नाही.सध्या कंट्रोलरुम येथे येणाऱ्या तांत्रिक अडचणी लक्षात घेता याबाबत ट्रायकलर कन्सल्टंट यांचे ऐवजी दुसरे मत (Second Opinion) ऑप्टिमिस्टिक, अ.नगर यांचे कडून मे व्हेन्टेज यांचे मार्फत खरेदी करण्यात आलेल्या सुरक्षा साहित्यांचे वॉरटीबाबत Comprehensive MC बाबतचा अभिप्राय घेण्यात यावा, असे ठरले होते.

त्यानुषंगाने Second Opinion बाबत मा.कार्यकारी अधिकारी साो, यांचे समवेत चर्चा करुन ऑप्टिमिस्टिक, अ.नगर यांचे कडून Comprehensive AMC बाबतचा अहवाल घेऊन मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे ठेवणे बाबतची कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले. त्यानुसार ऑप्टिमिस्टिक, अ.नगर या कंपनीचे कन्सल्टंट यांना जा नं.एसएसएस/वशी-संरक्षण/४६५२ दि.८.१.२०१४ अन्वये पत्र देण्यात आले.त्यानुसार प्र.शा. आ. नं. १६९६२ /दि.०८.०१.२०१४ अन्वये ऑप्टिमिस्टिक, अ.नगर यांचा Comprehensive AMC बाबतचा अहवाल इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

**सदरचा Comprehensive AMC बाबतचा अहवाल खालील प्रमाणे आहे.**

**अ)** मे व्हेन्टेज यांना देण्यात आलेल्या पहिल्या व दुसऱ्या टप्यातील वर्कऑर्डर मधील साहित्याचा AMC बाबतचा अहवाल.

| **Proposal Considered After Assorted Components For AMC** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 10 Oct 2013 to 9 Oct2014 | 10 Oct 2014 to 9 Oct2015 | 10 Oct 2015 to 9 Oct2016 | 10 Oct 2016 to 9 Oct2017 | |
| AMC Percentage | | | | | | | |
| S.N | Description Of PO | Amount | First Year | Second Year | Third Year | Fourth Year | Total |
| | | | **12.50%** | **13.50%** | **14.50%** | **15.50%** | |
| 1 | FirstWork Order | 3,27,33,082/- | 40,91,635.25/- | 44,18,966.07/- | 47,46,296.89/- | 50,73,627.71/- | 1,83,30,525.9/- |
| 2 | Second Work Order | 25,10,495/- | 3,13,811.875/- | 3,38,916.825/- | 3,64,021.775/- | 3,89,126.725/- | 14,05,877.2/- |
| | | | | **Total Comprehensive AMC Cost** | | | **1,97,36,403.1/-** |

**ब)** त्याचप्रमाणे कापडकोठी, लेखाशाखेमध्ये सुरक्षिततेच्या दुष्टीने कॅमेरे बसविण्यात आलेले होते सदर कॅमेरे हे उपरोक्त First Work Order व Second Work Order मधील नसुन त्याबाबतची स्वतंत्र मंजुरी घेण्यात येऊन कॅमेरे बसविण्यात आलेले आहे. तथापी, या कॅमेऱ्यांची मुदत ४ एप्रिल २०१४ मध्ये संपुष्टात येत आहे. त्यामुळे याबाबतचा Comprehensive AMC अहवाल पुढील प्रमाणे:-

| **Proposal Considered After Assorted Components For AMC** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 4 April 2014 to 3 April 2015 | 4 April 2014 to 3 April 2015 | 4 April 2014 to 3 April 2015 | 4 April 2014 to 3 April 2015 | |
| AMC Percentage | | | | | | | |
| S.N | Description Of PO | Amount | First Year | Second Year | Third Year | Fourth Year | Total |
| | | | **12.50%** | **13.50%** | **14.50%** | **15.50%** | |
| 1 | Kapad Koti | 1,03,475/- | 12,934.375/- | 13,969.125/- | 15,003.875/- | 16,038.625/- | 57,946/- |
| 2 | Account Departments | 9,43,883/- | 1,17,985.375/- | 1,27,424.205/- | 1,36,863.035/- | 1,46,301.865/- | 5,28,574.48/- |
| | | | | **Total Comprehensive AMC Cost** | | | 586520.48/- |

**क)** मे व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन, नोईडा यांनी Comprehensive AMC ची मंजुरी मिळालेनंतरचे कालावधीसाठी मेन्टेनंन्स कामाकरीता एक इंजिनियरकरीता एका वर्षासाठी रु.३,५०,०००/- +१२.३६% (४३२६०/-) असे एकुण रु.३,९३,२६०/- खर्च येणार आहे. अशाप्रकारे मेन्टेनन्सचे कामाकरीता असे दोन इजिनिअर घेणे झाल्यास, एक वर्षाकरीता रु.७,८६,५२०/- खर्च येणार आहे.

यावर ऑप्टिमिस्टीक अहमदनगर यांनी असे सुचित केले आहे की, पहिल्या टप्प्यातील वर्कऑर्डरचे अ नं.५६ नुसार एक इंजिनिअर व ४ तांत्रिक कर्मचारी आवश्यक होते. परंतु आता Comprehensive AMC ४ वर्षाचे कालावधीत मेन्टेनन्स कामाकरीता फक्त २ इंजिनिअरची आवश्यकता असलेबाबत व त्यांचे मासिक वेतनाबाबत संस्थानने मे.व्हेन्टेंज सिक्युरिटी सोल्युशन,नोईडा

यांचे समवेत चर्चा व वेतनाबाबतची वाटाघाटी करुन योग्य ते २ इंजिनिअरचे मासिक वेतन निश्चित करुन निर्णय घेण्यात यावा, असे अहवालात नमुद केले आहे.

**ऑप्टिमिस्टिक, अहमदनगर यांनी सादर केलेले अहवालानुसार..**

उपरोक्त **अ** तक्त्यात पहिल्या व दुसऱ्या वर्कऑर्डर मधील सुरक्षा साहित्यांची वॉरंटी कालावधी दि.०९/१०/२०१३ रोजी संपुष्टात आलेली आहे.त्यानुसार पुढील चार वर्षाकरीता सदर सुरक्षा साहित्यांची Comprehensive AMC चे कॉन्ट्रॅक्ट मे व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी यांना देणे झाल्यास चार वर्षाकरीता (दि.१०.१०.२०१३ ते दि.०९.१०.२०१७ अखेर) रक्कम रुपये- १,९७,३६,४०३/- (अक्षरी रुपये- एक कोटी,सत्याण्णव लाख, छत्तीस हजार चारशे तीन मात्र) खर्च येणार आहे.

उपरोक्त **ब** तक्त्यात कापडकोठी, लेखाशाखेमध्ये सदर कॅमेरे व त्यास लागणारे अनुषंगीक साहित्यांची वॉरंटी कालावधी ३ एप्रिल २०१४ मध्ये संपुष्टात येणार आहे. सदरील कॅमेरे व त्याअनुषंगीक साहित्यांची Comprehensive AMC चे कॉन्ट्रॅक्ट मे. व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी यांना देणे झाल्यास चार वर्षाकरीता (दि.०४.०४.२०१४ ते दि.०३.०४.२०१८ अखेर) रक्कम रुपये- ५,८६,५२०/- (अक्षरी रुपयेः- पाच लाख, श्याहऐंशी हजार,पाचशे, वीस मात्र) खर्च येणार आहे.

उपरोक्त **क** मधील तक्त्यात नमुद केले नुसार साहित्यांची ४ वर्षाचे Comprehensive AMC चे कॉन्ट्रॅक्ट कालावधीत मेन्टेनन्स कामाकरीता फक्त २ इंजिनिअरचे मासिक वेतनाबाबत संस्थानने मे.व्हेन्टेंज सिक्युरिटी सोल्युशन, नोईडा यांचे समवेत चर्चा व वेतनाबाबतची वाटाघाटी करुन Comprehensive AMC चे कॉन्ट्रॅक्ट मंजुर तारखेपासून ते पुढील चार वर्षाकरीता २ इंजिनिअरचे मासिक वेतन निश्चित करुन निर्णय होणेस विनंती.

अ आणि ब प्रमाणे मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सो.कंपनी, नोईडा यांना ४ वर्षाकरीता Comprehensive AMC कॉन्ट्रॅक्ट देणे झाल्यासः-

**अ)** प्रमाणे रु.१,९७,३६,४०३/- (अक्षरी रुपये-एक कोटी सत्याण्णव लाख छत्तीस हजार चारशे तीन मात्र)
**ब)** प्रमाणे रु ५,८६,५२०/- (अक्षरी रुपये- पांच लाख शहाऐंशी हजार पाचशे वीस मात्र) असे अ व ब करीता Comprehensive AMC कॉन्ट्रॅक्ट खर्च रक्कम रुपये -२,०३,२२,९२३/- (अक्षरी रुपये- दोन कोटी तीन लाख बावीस हजार नऊशे तेवीस मात्र) खर्च येणार आहे.

तसेच,

**क)** प्रमाणे Comprehensive AMC चे कॉन्ट्रॅक्ट मंजुर तारखे पासून ते पुढील चार वर्षाकरीता २ इंजिनिअरचे मासिक वेतन निश्चित करुन निर्णय होणेकामी मे.व्हेन्टेज यांचे प्रतिनिधी समवेत चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोएडा यांचेबरोबरच्या कराराची मुदत संपुष्टात आलेने त्यांनी दि.१० जानेवारी- २०१४ पासून सेवा देणे बंद केलेले आहे व त्यांचे बरेचसे कॅमेरे बंद स्थितीत आहेत. सदर कंपनीला पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देणेकामी श्री.प्रणव वर्मा, एक्झ्युटीव्ह डायरेक्टर, मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोएडा यांना सभेपुढे बोलविणेत आले होते. समितीने त्यांचेबरोबर चर्चा केली व मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोएडा यांची कार्यपध्दती समाधानकारक नाही, त्यामुळे सदरहूकामी नवीन टेंडर मागविणेत यावे, मात्र तत्पुर्वी मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोएडा यांचेप्रतिनिधींना पुढील सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, सी.सी.टी.व्ही.नियंत्रण कक्ष)

---

**विषय नं.०७** **रुग्णालये विभागाकरीता मे.मनोरमा इन्फोसोल्युशन प्रा.लि., कंपनीचे सॉफ्टवेअर देणगी म्हणून घेणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मे.मनोरमा इन्फोसोल्युशन प्रा.ली, कंपनीचे सॉफ्टवेअर देणगी म्हणुन स्विकारुन दि.०१.०४.२०१३ पासुन ऑनलाईन करण्याचे नियोजन होते. त्याचा उपयोग शासनाची जीवनदायी योजना, प्रस्तावीत राजीव गांधी आरोग्य योजना व इतर संपुर्ण रुग्णालयांचे अर्थिक व्यवहार सुरळीत होण्यास मदत झाली असती, त्यास अनुसरुन दि.२४.०१.२०१३ रोजीचे त्रिसदस्य समितीपुढे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन रुग्णालये विभागासाठी आवश्यक असलेले हार्डवेअर व सॉफ्टवेअर असे दोन्ही एकत्रित खरेदीसाठी तातडीने विहीत कार्यपध्दतीने टेंडर मागवीण्यात यावे असा निर्णय झाला व त्यामध्ये मे.मनोरमा इन्फोसोल्युशन यांनी देणगीचा प्रस्ताव दयावा असे ठरले होते.

त्यास अनुसरुन मा.उच्च न्यायालयाकडे साधारणतः ३.५ कोटी अधिक Tax अशा खर्चाचा प्रस्ताव दि.१८.०४.२०१३ रोजी सादर करण्यात आला होता. दि.२९.०८.२०१३ रोजी मा. उच्च न्यायालयाकडुन तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करुन न्यायालयास अहवाल सादर करणेबाबत कळविले होते. शासनाकडुन सद्यस्थितीतील अशा तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करण्यात आलेली नाही व सदर

बाब अदयाप विचाराधीन आहे. सदर प्रकल्प मोठया रकमेचा असल्याने त्यास अजुन काही कालावधी जाणार आहे.

मे.मनोरमा इन्फोसोल्युशन प्रा.ली, या कंपनीच्या CEO सौ.अश्विनी दानीगौंड या श्री साई दर्शनासाठी दि.०५.०१.२०१४ रोजी शिर्डी येथे आल्या होत्या त्यावेळी त्या मा.कार्यकारी अधिकारी तथा सदस्य व मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य यांची भेट घेतली यावेळी अदयाप टेंडर कार्यपध्दतीने सॉफ्टवेअर कार्यान्वित झाले नसल्याचे सांगण्यात आले. यावर रुग्णालयात याची तातडीने आवश्यकता असल्याकारणाने त्यांनी सदर देणगी आजही देण्यास तयार असलेबाबत सांगीतले. सध्या रुग्णालयाला साधारणतः एकुण ३० ते ४० संगणक संच देणगी म्हणुन मिळाले आहेत. एक अदयावत सर्व्हर साधारणतः रु.४ ते ४.५० लाख किमतीचा उपलब्ध झाल्यास श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये हे सॉफ्टवेअर ऑनलाईन करता येईल. यामुळे शासनाच्या जीवनदायी, राजीव गांधी योजना व इतर सर्व आर्थिक व्यवहार सुरळीत होतील, अशी चर्चा झाली आहे. बाबत रुग्णालये विभागाच्या एकुण ३० अधिकाऱ्यांनी सदर सॉफ्टवेअरचा डेमो पाहून ते उपयुक्त असल्याबाबत रिपोर्ट दिला आहे.

त्यास अनुसरुन निर्णय क्रं.५८/२४.०१.२०१३ मध्ये नमुद केलेप्रमाणे मे.मनोरमा इन्फोसोल्युशन प्रा.ली, या कंपनीकडुन सॉफ्टवेअर देणगी म्हणुन स्विकारल्या त्यासाठी ऑनलाईन करण्यासाठी Implementation, User/Staff Tranning खर्च रु.४.५० लाख इतका येईल. यामुळे सध्या कार्यरत असलेली राजीव गांधी आरोग्य योजना, जीवनदायाी आरोग्य योजनेचे प्रलंबित कामकाज, सेंट्रल मेडीकल स्टोअर, रुग्ण बिलींग विभाग, नर्सिंग स्टेशन, पॅथालॉजी, ब्लडबँक, डॉक्टर्स अकौंटींग, इ. सर्व कामकाज सुरळीत होऊन अर्थिक व्यवहारांच्या नोंदी विनाविलंब अचुकतेने घेण्यास मदत होईल. त्यास अनुसरुन सदर सॉफ्टवेअर देणगी म्हणुन स्विकारण्यास व त्यासाठी लागणाऱ्या अनुशांगीक रु.४.५० खर्चास मान्यता मिळणेस व आवश्यक असलेला सर्व्हर व संगणक संच देणगी म्हणुन इतर देणगीदारांकडुन घेण्यास अथवा विहीत कार्यपध्दतीने खरेदी करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१५८** **आजचे सभेत सदर प्रस्तावर चर्चा करणेसाठी मे.मनोरमा इन्फोसोल्युशन प्रा. ली., कोल्हापूर या कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.अश्विनी दानीगौंड व संस्थानचे वतीने श्री.विजय नायडु, तांत्रिक सल्लागार हे हजर होते. दोन्ही रुग्णालयांसाठी आर्थिक व्यवहार व रुग्णांना सेवा देणेसाठी हे सॉफ्टवेअर उपयुक्त ठरणार असल्याने प्रस्तावात नमूद केलेल्या अटी/ शर्तीवर करारनामा करणेत येऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी सदर सॉफ्टवेअर देणगी म्हणून घेणेस मान्यता देण्यात आली.**

**सदरचे सॉफ्टवेअर कार्यान्वीत करणेसाठी श्री.विजय नायडू, कोपरगाव यांनी सल्लागार म्हणून काम पहावे व कार्यान्वीत झाल्यानंतर सध्याचे अपूर्ण अवस्थेतील सॉफ्टवेअर बंद करुन टप्या- टप्याने याच अटी/ शर्तीवर श्री साईनाथ रुग्णालयातही देणगी सॉफ्टवेअर कार्यान्वीत करणेत यावे. यासाठी सल्लागार, वैद्यकीय संचालक, ई.डी.पी. विभाग प्रमुख व वित्त व्यवस्थापक यांची समिती तयार करणेत येऊन, सर्व संबंधीत विभागप्रमुखांवर आप-आपल्या विभागासंबंधीत मोडयुल्स सक्षमरित्या कार्यान्वीत करणेची जबाबदारी सोपवावी व या समितीच्या साप्ताहीक बैठकी आयोजित करणेत येऊन, याबाबतचा प्रगती अहवाल त्रिसदस्यीय समिती सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.**

**तसेच, याकामी Implementation, User/Staff Tranning साठी येणारा रु.४.५० लाख मात्र व आवश्यक असलेले सर्व्हर/ संगणक संच देणगी म्हणुन इतर देणगीदारांकडुन घेण्यास अथवा विहीत कार्यपध्दतीने खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०८** **संस्थानचे सेवाधाम इमारतीमध्ये साईभक्तांचे सुविधेसाठी टॉयलेट ब्लॉक बनविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूदः-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधींचा विनियोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः-** मौजे शिर्डी चे गावठान हद्दीत संस्थानची सेवाधाम इमारत साईभक्तांचे निवासासाठी उपलब्ध करणेत आली आहे. सेवाधाम इमारत ही शिर्डीच्या मध्यवर्ती भागात व नगर - मनमाड रोड लगत असल्याने मा. कार्यकारी अधिकारी सो यांनी सेवाधाम इमारतीचे पश्चिमेकडील पालखी रोडच्या बाजूने पुरुष व महिलांकरीता शौचालय व मुताऱ्यांची सोय करणेस सुचना दिल्या आहेत.

**प्रस्तावः-** सेवाधाम इमारतीचे पश्चिमेकडील बाजुने पालखी रोड लगत सोबत दर्शविलेल्या नकाशा प्रमाणे शौचालय व मुताऱ्यांची व्यवस्था करता येईल. यामध्ये पुरुष व महिलांसाठी प्रत्येकी एक

शौचालय, ०७ युरीनल व ०१ वॉशिंग प्लेस बनवता येतील यासाठी त्यामध्ये अंतर्गत फरबदल व नुतनीकरणाची खालीलप्रमाणे कामे करावे लागतील.

इमारतीमधील टॉयलेट ब्लॉकच्या ठिकाणच्या अंतर्गत भिंती व फ्लोअरींग काढणे.

प्रत्येकी एक शौचालय व ०७ युरीनलची व्यवस्था करणे.

ॲन्टी स्किड फ्लोअरींग व सिरॅमिक टाईल्स बसविणे.

अंतर्गत प्लंबींग व इलेक्ट्रीकलची कामे करणे.

सन २०१३-२०१४ चे जिल्हा दरसुची दरानुसार याकामी अंदाजे रक्कम रु. ९,६३,०००/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** साईभक्तांचे सुविधेसाठी संस्थानचे सेवाधाम इमारतीचे पश्चिम बाजुस पालखी रोड लगत पुरुष व महिलांसाठी शौचालय व मुताऱ्यांची व्यवस्था करणेकामी येणारे रक्कम रु. ९,६३,०००/- मात्रचे खर्चास व याकामी विहित पध्दतीने वर्तमान पत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन कार्यवाही करणेकामी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांचे सुविधेसाठी संस्थानचे सेवाधाम इमारतीचे पश्चिम बाजुस पालखी रोड लगत पुरुष व महिलांसाठी शौचालय व मुताऱ्यांची व्यवस्था करणेसाठी विहित पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात देण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ९,६३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९** **सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणासाठी वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधिल कलम १७(०२)(ग) मधील तरतूदीनुसार, विश्वस्त व्यवस्थेच्या हिशोबाची, राज्य शासन निर्देश देईल अशा व्यक्तीकडून पुढील लगत वर्षातील अशा तारखेपर्यत वार्षिक लेखापरिक्षण करण्याची व्यवस्था करील. कलम २९(०१) मध्ये पुढील प्रमाणे तरतूद आहे. समिती त्या विश्वस्त व्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमा खर्चाचा तपशिल दर्शविणारा दि.३१ मार्च, रोजी संपणा-या प्रत्येक वित्तीयवर्षाचा लेखापरिक्षकांचा अहवाल, तसेच ज्यांना या विश्वस्त व्यवस्थेकडून आर्थिक सहाय्य देण्यात आले अशा देणगी स्विकारणा-या संस्थेची (संपूर्ण पत्यासह) तपशिलवार यादी व असे आर्थिक सहाय्य मागण्यामागील उद्देश व सहाय्याची रक्कम याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या छाननी समितीचा अहवाल, यांसह वार्षिक अहवाल तयार करवून घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत शासनाला व एक प्रत धर्मादाय आयुक्ताला त्या वर्षाच्या ३० जूनच्या आत सादर करील.

संस्थानचे आर्थिक वर्ष माहे एप्रिल ते माहे मार्च असे आहे. सन २०१३-१४ या चालू आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल माहे ३० जून, २०१४ पूर्वी पूर्ण होणे गरजेचे आहे. त्यासाठी संस्थानचे लेखे लेखापरिक्षणासाठी तयार करणे, वैधानिक लेखा परिक्षकांनी लेखा परिक्षण करून त्यांचा अहवाल सादर करणे, सदरचा लेखा परिक्षण अहवाल मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपूढे ठेवून त्याची नोंद घेणे, त्यानंतर तो राज्य शासनास व मा.धर्मादाय आयुक्तास सादर करणे आवश्यक आहे. आता सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक यांची नेमणुक करणे आवश्यक आहे.

सन २०११-१२ व सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी शासनामार्फत मे.कोचर ॲन्ड असोसिएटस, चार्टर्ड अकौटंटस, मुंबई. यांची अनुक्रमे रु.७५,०००/-मात्र अक्षरी रुपये पंचाहत्तर मात्र ) व रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र) व त्यावरील अनूज्ञेय असणारा सेवाकर इतक्या फी वर वैधानिक लेखापरिक्षणासाठी नेमणुक करण्यात आलेली होती .

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरीता मान्यता प्राप्त चार्टर्ड अकौटंटस संस्थेची संस्थानचे लेखापरिक्षण करणेकामी, वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक करणेबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाच्या मान्यतेसाठी पाठवणेस मान्यता मिळणेकामी, तसेच शासनाने नेमणुक केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकास शासनाने निर्देशित केलेले मानधन व त्यावर अनुज्ञेय असणारा सेवाकर आदा करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेसाठी मा.त्रीसदस्यीय समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.१६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरीता मान्यता प्राप्त चार्टर्ड अकौटंटस संस्थेची संस्थानचे लेखापरिक्षण करणेकामी, वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक करणेबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाच्या मान्यतेसाठी पाठवणेस व शासनाने नेमणुक केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकास शासनाने निर्देशित केलेले मानधन तसेच, त्यावर अनुज्ञेय असणारा सेवाकर आदा करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१०** **श्रींचे आराधना विधीबाबत.**

**प्रस्ताव-** मा अध्यक्ष महोदय यांनी पत्रामध्ये खालीलप्रमाणे निर्देश केलेले आहेत- श्रीसाईबाबा आराधना विधी दरवर्षी विजयादशमीच्या मुहूर्तावर समाधी मंदिरावरील पहिल्या माळयावर करण्यात येतो. या विधीकरीता काही प्रतिष्ठित लोकांना बोलावण्यात येते. मागील दोन वर्षांच्या अनुभवावरुन असे लक्षात आले आहे की, सदरहू विधी पाहण्याची अनेक भक्तांची व गावक-यांची इच्छा असते परंतु ज्या जागी हा विधी करण्यात येतो त्या जागेचे अत्यंत लहान स्वरुप लक्षात घेता जास्तीतजास्त लोकांना तेथे प्रवेश देणे शक्य नसते. समाधी मंदिर जवळपास १०० वर्षांचे जुने असल्यामुळे, मंदिराचे पहिल्या माळयावरील श्रींचा नैवेद्य करण्याची खोलीसुद्धा त्या ठिकाणावरुन स्थलांतरीत केली आहे. वास्तुचे पावित्र्य व वय लक्षात घेता जास्त लोकांची वर्दळ त्याठिकाणी असणे योग्य नाही. त्याच बरोबर आराधना विधीचा लाभ जास्तीतजास्त भक्तांना व गावकऱ्यांना घेता यावा ही भक्तांची व गावकऱ्यांची मागणी देखील दुर्लक्षित करता येणार नाही करीता-

**१)** सन-२०१४ पासून आराधना विधी सभाकुंड (सभामंडप) येथे करण्यात यावा व तो सर्व भक्तांकरीता खुला ठेवावा, जेणेकरुन ज्या गावकऱ्यांची व भक्तांची इच्छा असेल त्यांना हा विधी सोहळा पाहता येईल.

**२)** आराधना विधीकरीता जे ब्राह्मण व सुवासिनी बोलावले जातात त्यांच्याकरीता प्रसादाची व्यवस्था जुना सत्यनारायण पुजा हॉल येथे करावी.

**३)** सर्व गावक-यांकरीता प्रसादाची सोय प्रसादालयाच्या व्ही आय पी हॉलच्या बाजुला असलेल्या दोन हॉल्समध्ये करावी.

**४)** सदरहू आराधना विधीचे थेट प्रक्षेपण (Live Telecast) करावे. यामुळे भक्तांची संख्या जास्त असली तरी मंदिर परिसरातील दूरचित्रवाणीच्या संचावर तो सोहळा त्यांना थेट पाहता येईल व संपूर्ण जगात देखील भक्तांना सोहळा बघता येईल.

वरीलप्रमाणे कायमस्वरुपी योजना केल्यास इच्छुक गावक-यांना व भक्तांना आराधना विधीला उपस्थित राहण्याचा व प्रसादाचा लाभ घेता येईल.

याप्रमाणे सूचना मा अध्यक्ष महोदय यांनी पत्राद्वारे केल्या असून, सदर विषय मा.त्रिसदस्यीय समितीचे अवलोकनार्थ ठेवणेबाबत सूचीत करण्यात आलेले आहे.

या विधीची परंपरा ही फार जुनी असून, संतपरंपरेत संतांच्या महानिर्वाणाच्या तिथीचे दिवशी आराधना विधी (श्राद्धविधी) करण्यात येतो. श्रींनी विजयादशमीचे दिवशीच आपल्या अवतार कार्याची समाप्ती केल्याने विजयादशमी उत्सवास श्रींचा पुण्यतिथी उत्सव असे देखील म्हणतात.

आपल्याकडे श्रींचा आराधना विधी दरवर्षी रितीरिवाजानुसार व परंपरेनुसार विजयादशमी (दसरा) उत्सवाचे मुख्य दिवशी शास्त्रशुद्ध पद्धतीने करण्यात येतो. या विधीकरीता संस्थानचे मा.अध्यक्ष साो. यजमानपदी असतात आराधना विधीस सकाळी १०:४५ वा सुरुवात करुन श्री गणेशादि पूजन करुन मुळ श्रींचा आराधना विधी अपराण्ह काळात सुरुवात करुन साधारणतः दुपारी १२:२० ते १२:२५ या वेळेच्या दरम्यान सर्व विधी समाप्त करण्यात येऊन नेहमीप्रमाणे उत्सव काळात १२:३० वा. श्रींची माध्यान्ह आरती करण्यात येते.

श्रीसाईनाथांचा आराधनाविधी पूर्व परंपरेप्रमाणे श्रींचे समाधी मंदिरातच (बुट्टीवाडयात) पहिल्या माळयावरील हॉल येथे करण्यात येतो व परंपरा याचा विचार करता आराधनाविधी समाधी मंदिराचे हॉलमध्येच करावा, असे संस्थान पुजारी यांचेही मत आहे.

या विधीकरिता सन-१९८४ पूर्वी कमिटीचे अगोदर १९६० ते १९८४ पर्यंत मा.कोर्ट रिसीव्हर यांचे काळात यजमान म्हणून मंदिर प्रमुख व संस्थानचे पुजारी असे मिळुन श्रींचा समाराधना विधी करण्यात येत असे. सन-१९८४ नंतर मा.कार्यकारी अधिकारी हे यजमान म्हणून बसत असत व संस्थान पुजारी पूजा करीत असे. त्याकाळात समाराधना विधीस आराधना विधी संबोधण्यात आले. सन-१९८९ नंतर सदर पुजेसाठी संस्थानचे मा.अध्यक्ष किंवा मा.कार्यकारी अधिकारी यजमान म्हणून बसत असे व ते आजतागायत तसेच चालत आलेले आहे. श्रींचा देह बुटींच्या वाड्यात ठेवण्यात आलेल्या म्हणजे समाधी स्थान बुटीवाड्यात करण्यात आलेले आहे. ते श्रीसाईबाबांचे सांगणेवरुनच करण्यात आलेले आहे. त्यानंतर सदरचा विधी हा समाधी मंदिरामध्येच करण्यात येत आहे. सदरचा विधी हा यजमान व संस्थान ब्रह्मवृंद यांचे खेरीज इतरांनी करु नये असे आहे.

श्रीक्षेत्र शेगांव येथील श्रीगजानन महाराज यांचा श्राद्ध विधीबाबत मा.अध्यक्ष, श्री.विष्णूपंत यांचेशी दुरध्वनीवरुन विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, भाद्रपद महिन्यात श्राद्ध केले जाते व ते फक्त पुजारी समाधीजवळ करतात. इतरांना प्रवेश नाही किंवा इतरांचा तेथे सहभाग नाही. तेथील मा.अध्यक्ष सुद्धा पूजेकरिता नसतात, असे आहे व समाराधना पूजा विधी ऋषीपंचमीस पुण्यतिथीचे दिनी केला जातो. तो फक्त ब्रह्मवृंदामार्फतच केला जातो. तेथेही इतरांना प्रवेश नसतो.

बुटीवाड्यास शंभर वर्षे होत आहे. वास्तु जुनी झाली आहे तेथे वर्दळ नको म्हणून मा.यजमान व संस्थानचे पुजारी यांचेशिवाय इतरांना सदर विधीस हजर राहू देवू नये, असे नम्र मत आहे. त्यामुळे वर्दळ

होणार नाही. तशी विनंती गांवकरी, साईभक्त व इतरांना करता येईल. तसेच सदर विधीचे थेट प्रक्षेपण टि.व्हीवर अथवा मोठ्या स्क्रीनवर करता येईल. म्हणजे गांवकरी व साईभक्त यांचा विधी पाहण्याचा प्रश्न राहणार नाही. स्क्रीनवर दर्शन घेता येईल. सध्या आराधना विधी संपल्यानंतर १० ते १५ मिनीटांत सर्व साहित्य आवरण्यात येते व पूजा विसर्जित करण्यात येते.

सदरचा विधी सार्वजनिक केल्यास सदर विधीस अनन्य साधारण महत्व असल्याने ज्या ठिकाणी पूजा करण्यात येईल, त्याठिकाणी दर्शन घेणाऱ्यांची संख्या असंख्य राहिल. ती गर्दी थांबविता येणार नाही. (समाराधना) आराधना विधी झाल्याबरोबर आरती सुरु होते. त्यामुळे भक्तांना मज्जाव करता येणार नाही, बंद करता येणार नाही. पर्यायाने सिक्युरिटी व साईभक्त, गावकरी यांच्या भांडणे निर्माण होऊ शकतात. प्रक्षेपण LIVE मोठ्या स्क्रीनवर करता येईल, असे नम्र मत आहे. तरी सदर विधी सार्वजनिक करणेचा असल्यास करता येईल.

परंपरेनुसार समाधीस्थळाजवळच आराधनाविधी करुन ब्राह्मणपूजन व सुवाष्णपूजन व भोजन आदी विधी करावे असा आहे. पूर्वी आराधनाविधी समाधीचे दक्षिण बाजूस सध्याचे व्ही आय पी रुममध्ये होत असे. आराधना विधी वरील हॉलमध्येच करावा व त्याचे थेट प्रक्षेपण सध्याचे (LCD) एलसीडीद्वारे मोठया स्क्रिनवर भक्तांना व गावकऱ्यांना पहाणेसाठी उपलब्ध करावा. तसेच ब्राह्मण,सुवासिनी भोजन सत्यनारायण हॉलमध्ये ठेवावे.

पूर्वी सदर विधीनंतर फक्त मा.अध्यक्ष सो, मा.उपाध्यक्ष सो, मा.विश्वस्त व निमंत्रीत ब्राह्मण व ब्राह्मण सुवासिनी व पालखी सेवेकरी यांना प्रसाद भोजनाची व्यवस्था समाधी मंदिराचे पहिल्या माळ्यावर करण्यात येत असे. त्यावेळी अंदाजे ५०-७५ लोकांच्या प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येत असे.
सन २००४ नंतर मा व्यवस्थापन समिती आल्यानंतर प्रसाद भोजन करणाऱ्यांमध्ये शिर्डीतील आजी-माजी नगरसेवक, ग्रामस्थ, मानकरी व त्यांचे मित्र परिवार साईभक्त हे आराधना विधी व प्रसाद भोजनाकरीता हजर राहू लागले. त्यामुळे समाधी मंदिरावरील जागा अपुरी पडत असे. करीता सदर व्यवस्था बदलण्यात आली व संस्थानचे श्रीसत्यनारायण हॉलचे दालनाचे वरील मोकळ्या जागेत हलविण्यात आली. त्यावेळी त्याची संख्या २००- २५० इतकी होती. प्रत्येक वर्षी सदर संख्येमध्ये वाढ होत असल्याचे दिसून आले. मागील वर्षी एकूण अंदाजे ३५० - ४०० व्यक्ती प्रसाद भोजनास उपस्थीत होते.

सर्व गावकऱ्यांकरीता प्रसादाची सोय प्रसादालयाच्या व्ही आय पी हॉलच्या बाजुला असलेल्या दोन हॉल्समध्ये करण्यात यावी जेणेकरुन दिवसेंदिवस श्रींचे आराधनाविधीकरीता वाढती संख्या लक्षात घेता प्रसाद भोजन प्रसादालयामध्ये व्ही आय पी हॉलच्या बाजूला असलेल्या दोन हॉल्समध्ये केल्यास सर्वांना शिस्तबद्धपणे व शांततेत प्रसाद भोजनाचा लाभ घेता येईल असे नम्र मत आहे. श्रींचा आराधना विधी हा फक्त यजमान व पुजारी (ब्राह्मण) हेच पूर्वीपासून करीत होते. तेथे इतरांची वर्दळ नसे. सदरचा विषयाबाबत मा त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.१६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आराधना विधीचा लाभ जास्तीतजास्त भक्तांना व गावकऱ्यांना घेता यावा यासाठी आराधना विधी समाधी मंदिराच्या उत्तर दिशेला असलेल्या सभाकुंड येथे करण्यात यावा, सदरहू आराधना विधीचे थेट प्रक्षेपण (Live Telecast) करणेत यावे, यामुळे भक्तांची संख्या जास्त असली तरी मंदिर परिसरातील दूरचित्रवाणीच्या संचावर व संपूर्ण जगात देखील भक्तांना हा सोहळा बघता येईल. आराधना विधीकरीता जे यजमान, ब्राह्मण व सुवासिनी बोलावले जातात त्यांची प्रसादभोजनाची व्यवस्था जुना सत्यनारायण पुजा हॉल येथे करणेत यावी. इतर सर्व गावकरी व मान्यवर यांची शाही भोजनाची व्यवस्था श्री साई प्रसादालयाच्या व्ही. आय. पी. हॉलच्या बाजुला असलेल्या दोन हॉल्समध्ये करणेत यावी. या दिवशी साईभक्त व गावकऱ्यांसाठी श्री साई प्रसादालयामध्ये मोफत प्रसादभोजन संस्थानतर्फे देण्यात यावे.**

**तसेच, श्री साईबाबा विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत वर्षातून केवळ तीन सण रामनवमी, गुरुपोर्णिमा व विजयादशमी हे उत्सव म्हणून साजरे केले जातात. या तीनही सणांत साईभक्तांचा व सर्व गावकऱ्यांचा समावेश असतो म्हणून त्री-सदस्यीय समितीची अशी ईच्छा आहे की, या तीनही सणांना गावकरी व साईबाबांच्या सर्व भक्तांना संस्थानमार्फत मोफत प्रसादभोजन देण्यात यावे. या उत्सव कालावधीमध्ये गावकरी व भक्तांची प्रचंड गर्दी लक्षात घेता, प्रसाद भोजन सुटसुटीतपणे व चांगल्या पद्धतीने देता यावे याकरिता कोणत्या विशिष्ट प्रकारचे पदार्थ भोजनामध्ये देण्यात येतील, हे ठरविण्याकरिता मंदिरातील जेष्ठ व प्रमुख ब्राह्मण, प्रसादालय प्रमुख व संस्थानचे संबंधीत अधिकारी तसेच गावकऱ्यांतर्फे प्रथम नगराध्यक्ष अथवा त्यांनी सुचविलेले कुठलेही नगरपंचायत सदस्य यांची एकत्रित बैठक आयोजित करुन, त्यात मोफत प्रसादभोजनाच्या पदार्थांची यादी (menu) ठरविण्यात यावा व ही मोफत प्रसादभोजन व्यवस्था रामनवमी २०१४ या उत्सवापासून सुरु करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग/ अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.११ श्री रामनवमी उत्सव- २०१४ निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करणेस परवानगी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती रिम्पल लोहिया, माजी विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांनी आपले पत्र आवक क्र १८६२१ दि.०३/०२/२०१४ पत्रान्वये कळविले की, श्रीरामनवमी उत्सव- १४ निमित्ताने समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट देणगी दाखल करुन देण्यास तयार आहे. यासाठी त्यांनी संस्थान कडे परवानगी मागीतलेली आहे. त्यांनी श्री रामनवमी उत्सव -११ या निमित्ताने फुल सजावट केलेली आहे.

संस्थान, संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येते सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी स्वरुपात सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते.

फुल सजावट करणारा साईभक्त हा कारागीर यांना फुल सजावटीचे पैसे देवून काम करुन घेतो तर हया कारागीरांना मोफत राहणे, जेवणे इत्यादी सुविधा पुरविल्या जावू नये. यासाठी श्री संजय कोते यांनी दिनांक २०/१०/२०१४. रोजी तक्रार अर्ज दिलेला आहे. फुलसजावट करणाऱ्या भक्तांच्या मागणी नुसार आपण एक- दोन दिवसासाठी ०१ हॉलची मोफत सुविधा करुन देतो आहे. या काळात प्रसादालयात सुध्दा मोफत जेवणाची सोय चालू असते.संस्थान मार्फत सामान चेक करणे, मंदीरात कॅमेरे, सोन्याचे काम केलेले असल्यामुळे फुलसजावट करणारे कामगार यांचे वर लक्ष ठेवणेसाठी संस्थान कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाते. श्री कोते यांनी मोघमपणे किंवा कोणत्याही प्रकारची कल्पना नसतांना खोडसळपणे हे पत्र दिले आहे.

श्री आंनद इंगवले, नवी मुंबई यांनी मकर संक्राती निमित्ताने मंदीर व मंदीर परिसरात फुल सजवट करण्यास परवानगी दिलेली होती. मागील वर्षी श्री रामनवमी उत्सवासाठी श्री देवराज, कर्नाटक यांनी फुल सजावट करणेस परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच संरक्षण विभागा मार्फत फुल सजावटीचे सामान तपासणी करण्यात येते, फुल सजवाटीचे काम करणारे कारागीर यांचे नाव, पत्ता, मोबाईल नंबर व फोटो इ. माहिती घेण्यात येते.

श्रीमती. रिम्पल लोहिया, नागपूर यांना श्री रामनवमी उत्सवा निमित्ताने मंदीर व मंदीर परिसरास फुल सजावट करणेस परवानगी देणेस व मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २६/०७/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६०९ अन्वये देणगीदार यांना राहण्यासाठी ०१ AC रुम, दर्शन, भोजन पास व फुल सजावट करणारे कारागीर यांना सामान ठेवणेसाठी हॉल व जेवाणाची व्यवस्था संस्थान मार्फत करता येईल

तरी फुल सजावट करणेस व देणगीदार,फुल सजावट करणारे कारागीर यांना राहण्याची, जेवणाची, दर्शनाची सोय करता येईल.

तरी सदरच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१६२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती. रिम्पल लोहिया, नागपूर यांना श्री रामनवमी उत्सव- २०१४ निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, फुल सजावटदार यांना निवासासाठी ०१ ए.सी. रुम, सजावट करणारे कारागीर यांना निवास व सामान ठेवणेसाठी ०१ हॉल तसेच त्यांची प्रसादभोजन व दर्शनाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख / अधिक्षक, श्री साईप्रसाद निवासस्थान/ अधिक्षक, श्री साईप्रसादालय/ जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.१२ सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता द्वारावती भक्तनिवास व परिसर स्वच्छता/ हाऊसकिपींग (आऊट सोर्सिंग) कामाबाबत.**

**प्रस्ताव-** द्वारावती भक्तनिवास विभागाचे इमारतीमध्ये ८० एसी. व २३६ नॉन एसी अशा एकुण ३१६ खोल्या साईभक्तांना निवासासाठी देण्यात येतात. त्या खोल्या भक्तांनी खाली केलेनंतर त्याची साफ सफाई तसेच हाऊस किपींग व द्वारावती विभागाचे इतर परिसराची स्वच्छता इत्यादी कामे, आऊट सोर्सिंग पद्वतीने करुन घेतली जातात.

संस्थानच्या द्वारावती भक्तनिवास विभागाकडे मे.बी.व्ही.जी.इंडीया प्रा.लि,पुणे ही कंपनी दि.०१/०४/२०१० पासुन स्वच्छता व हाऊसकिपींगची कामे आऊटसोर्स पद्धतीने सध्या करत आहे.

त्यांना उपरोक्त कामासाठी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२७/०४/२०१३ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.३५३ व कार्यादेश जा.एसएसएस/वशी-द्वारावती/ ८४१/ २०१३ दि.१८/०५/२०१३ अन्वये स्वच्छतेसाठी आवश्यक असणाऱ्या मशिनरी,केमीकल्स व प्रतिदिनी ७६ कर्मचा-यासह दरमहा सर्व करांसह रु. ८,३०,०००/- चा कार्यादेश देण्यात आलेला आहे. या कामाची मुदत दि.३०/०४/२०१४ अखेर संपुष्टात येत आहे.

दिनांक ०१/०५/२०१४ ते दिनांक ३०/०४/२०१५ या पुढील आर्थीक वर्षासाठी द्वारावती भक्तनिवास इमारत व परिसराचे स्वच्छता व हाऊसकिपींग कामे आऊटसोर्सीग पद्धतीने करणेसाठी

बी.व्ही.जी. इंडीया लि., पुणे यांनी त्यांना सध्या देण्यात येत असलेल्या रु.८,३०,०००/- या रकमेवर २०% वाढ करुन पुढील वर्षासाठी मुदतवाढ मिळणे बाबत पत्राद्वारे कळविलेले आहे.

द्वारावती भक्तनिवास इमारत व परिसराचे स्वच्छता व हाऊसकिपींग कामे आऊटसोर्स पद्धतीने करुन घेणे संस्थानचे दृष्टीने हितावह आहे. त्याकरीता मोठया विविध प्रकारच्या मशिनरी, लहान विविध उपकरणे, निविदेत नमुद केले प्रमाणे स्वच्छतेचे केमिकल्स् व ७६ कर्मचा-यासह स्वच्छता/ हाऊसकिपींग कामाकरीता (आऊट सोर्सींग) उपरोक्त कालावधीसाठी...

**०१.** बी.व्ही.जी.इंडीया लि, पुणे यांचे पत्रानुसार त्यांना २०% वाढीव दराने मुदतवाढ द्यावी किंवा कसे?

**किंवा**

**०२.** नव्याने नामांकित कंपन्यांकडुन निवीदा मागविणे बाबत वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करावी लागेल.

तरी उपरोक्त अ.नं.०१ व ०२ मध्ये नमुद केलेप्रमाणे सदरचा विषय मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेपुढे निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.१६३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या द्वारावती भक्तनिवास व परिसर स्वच्छता/ हाऊसकिपींग (आऊट सोर्सिंग) काम करत असलेले मे.बी.व्ही.जी.इंडीया लि, पुणे यांची मुदत दि.३०.०४.२०१४ अखेर संपुष्टात येत असलेने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता द्वारावती भक्तनिवास व परिसर स्वच्छता/ हाऊसकिपींग (आऊट सोर्सिंग) काम करुन घेणेसाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्यांकडून निविदांची मागणी करणेत यावी. याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,२०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत आहे त्याच अटी/ शर्तीवर मे.बी.व्ही.जी.इंडीया लि, पुणे यांना मुदतवाढ देणेत यावी व दरम्यानचे कालावधीत याकामी येणाऱ्या खर्चास संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठास अर्ज करणेत येऊन, मा.खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, द्वारावती भक्तनिवास/ विधी अधिकारी)

---

विषय नं.१३ **यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनन्स्/ स्वच्छता कामी मे.बी.व्ही.जी. लि., पुणे यांना आऊटसोर्सिंग पध्दतीने दिलेल्या कामास मुदतवाढ देणे अथवा निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनन्स्चे काम दि.०१/०४/२०१३ ते दि.३१/०३/२०१४ या कालावधीत आऊटसोर्सिंग पध्दतीने करणे कामी इकडील जा.नं. एसएसएस/वशी-साईआश्रम -१/५६९१/२०१३ दि.१४/३/२०१३ अन्वये बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे यांना कार्यादेश देण्यात आलेला होता. सदर कामी संबंधीत कंपनीने दि. ०१ /११ /२०१३ रोजी करारनामा करुन दिलेला आहे.

| मनुष्यबळ संख्या | स्वच्छता कामी मशिनरी/ उपकरणे संख्या | दरमहा सर्व करासह रक्कम |
|---|---|---|
| ४५० | २३९ | ६४,२८,५७१/- |

सदर कामासाठी दरमहा रु.६४,२८,५७१/- एवढया रक्कमे मध्ये दररोज मनुष्यबळ ४५० कर्मचारी पुरविण्यात येऊन, स्वच्छता कामी लागणारी मशिनरी/ उपकरणे संख्या- २३९ पुरविणे व स्वच्छतेसाठी लागणारे केमिकल्स व साहीत्यासह मंजुर केलेले होते.

त्यानुसार सदर कंपनी दि.०१/०४/२०१३ पासून साईआश्रम भक्तनिवास विभागात यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनेन्सची कामे करुन देत आहे. सदर कामाचा कालावधी दि.३१/०३/२०१४ रोजी संपणार आहे.

बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे यांनी दि.३०/१२/२०१३ चे अर्जात अशी विनंती केली आहे की, पुढील वर्षासाठी मुदत वाढ मिळावी व किमान वेतनात तसेच हाऊसकिपींगच्या कामासाठी लागणारे स्वच्छता केमीकलचे दर वाढल्याने सध्याचे दरामध्ये १५% दरवाढ मिळावी अशी विनंती करण्यात आलेली आहे.

सदर कंपनीचे विनंती अर्जा नुसार मासिक वेतना मध्ये १५ % ने वाढ करुन दिल्यास हाऊसकिपींग कामापोटी माहे एप्रिल २०१४ पासुन पुढील आर्थिक वर्षा अखेर पर्यंत दरमहा सर्व करा सह रक्कम अदा करावी लागणार आहे. (कॉलम नंबर ५ नुसार )

| मनुष्यबळ संख्या | स्वच्छता कामी मशिनरी उपकरणे संख्या | सन २०१३-१४ दरमहा सर्व करासह देय रक्कम | कंपनीने सन २०१४-१५ साठी १५% ने दरमहा सर्व करासह वाढीव मागणी केलेली रक्कम | सन २०१४-१५ दरमहा सर्व करासह वाढीव एकूण रक्कम | सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात सर्व करासह होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ४५० | २३९ | ६४,२८,५७१/- | **९,६४,२८६/-** | **७३,९२,८५७/-** | ८,८७,१४,२८४/- |

तसेच सदरचा विभाग नव्याने सुरु झालेला असल्याने, नव्याने सुरु करावयाच्या भक्तांच्या सुख सुविधेसाठी काही विभागांना मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे काही विभागानी आऊटसोर्स कर्मचारी मिळणेबाबत प्रशासनाची मान्यता घेऊन,ती मान्यता या विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी दिलेले असून, त्यानुसार जादा मनुष्यबळ व त्यावर किमान वेतन दरानुसार होणारा खर्चाबाबतचा तपशील खालील तक्त्यात दर्शवला असून यावर संबंधीत कंपनीशी चर्चा वाटाघाटी करुन निर्णय घ्यावा लागेल.

| अ. नं. | विभाग | मंजुर प्रस्ताव | कामाचा तपशील | कुशल कर्मचारी संख्या (दर रु २७०.२०पै) | अकुशल कर्मचारी संख्या (दर रु २३९.४३पै) | एकुण मासिक संभाव्य खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाहन (साईआश्रम भक्तनिवास) | दि.०६/०१/२०१४ | बॅटरी कार ऑपरेट करणेसाठी | ६ | -- | ४८,६३६/- |
| २ | कॅन्टीन | दि.२२/०१/२०१४ चे पत्र | साईभक्तांना अल्प दरात सुख सुविधा पुरविणेकामी चहा, कॉफी, दुध, बिस्कीटे नाष्टा पाकीटे व मिनरल वॉटरची विक्री करणे कामी | -- | ३३ | २,३७,०३६/- |
| ३ | साईआश्रम भक्तनिवास | -- | वाहन विभागाकडून येणा-या बस वरील ड्रायव्हर साठी एक मदतनिस | -- | ०३ | २१,५४९/- |
| | | | एकुण | ०६ | ३६ | ३,०७,२२१/- |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे कुशल ६ कर्मचारी व ३६ अकुशल कर्मचारी असे एकूण ४२ कर्मचारी साठी दरमहा किमान वेतन दरानुसार रु ३,०७,२२१/- एवढा संभाव्य खर्च अपेक्षित आहे.

सदर कंपनीने हाऊसकिपींग कामासाठी पुरविलेल्या आऊटसोर्स कर्मचा-यांना किमान वेतन दराप्रमाणे पगार दिला गेला पाहीजे अशी अट कार्यादेशात देण्यात आलेली आहे.

त्यानुसार कंपनीला कार्यादेश दिलेनंतर कुशल कामगार वेतन दरामध्ये ३.६६४% ने व अकुशल कामगार वेतन दरामध्ये ४.१५५% ने वाढ झालेली आहे. तसेच पुढील वर्षामध्ये दोन वेळेस कंत्राटी कुशल व अकुशल कामगारांच्या किमान वेतन दरामध्ये साधारण अंदाजे ४ % ने संभाव्य वाढ होईल. म्हणजेच

१) सन २०१३-१४ या चालु वर्षा मध्ये सहा महिन्यात सरासरी ३.९१ % ने झालेली किमान वेतनातील दर वाढ ( ३.६६४ % + ४.१५५ % = ७.८१९ ÷ २ = सरासरी ३.९१ % ) व

२) पुढील सन २०१४-१५ मध्ये दर सहा महीन्यानंतर दोन टप्यामध्ये अंदाजे ४% ने वाढ गृहीत धरल्यास वर्षाच्या शेवटी अंदाजे ८% ने संभाव्य किमान वेतन दरात वाढ होईल. तसेच

३) कंपनी पुरवित असलेले हाऊसकिपींग कामासाठी साठी लागणारे साहीत्य व केमिकल्स यांच्या किमतीत ही संभाव्य वाढ होत असते.

सबब-

**अ)** सन २०१३ -१४ या कालावधीमध्ये बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे हे साईआश्रम भक्तनिवास मधील व परिसरातील स्वच्छता/हाऊसकिपींगची कामे चांगल्या प्रकारे समाधानकारक करुन देत असल्यामुळे साईभक्तांनी समाधान व्यक्त केलेले आहे. त्यामुळे यापुढील कालावधी साठी हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनन्स्ची कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणे संस्थानचे दृष्टीने हितावह आहे.

**ब)** उपरोक्त तीन मुद्दयांचा विचार केल्यास किमान वेतन दरात व साहीत्याच्या किमंतीमध्ये होणारी वाढ याचा ही विचार करावा लागणार आहे. त्यासाठी

१) ४५० मनुष्यबळ व २३९ स्वच्छताकामी लागणारी मशिनरी उपकरणे तसेच केमिकल साहीत्यासह १५% ने मागणी केलेली दरमहा वाढ रु ९,६४,२८६/- या रक्कमेसह (रु.९,६४,२८६/- १५% वाढीव दर + रु ६४,२८,५७१/-मागील वर्षाचा दरमहा दर) एकूण दरमहा रु. ७३,९२, ८५७/- या रक्कमेवर चर्चा करुन कंपनीकडून आपणास लागत असणारे जादा ४२ मनुष्यबळसह एकूण होणारा ४९२ मनुष्यबळ व स्वच्छता कामी लागणारी २३९ मशिनरी/ उपकरणे व केमिकल साहीत्यासह दरमहा वाढीव मागणी केलेली १५% रक्कमे बाबत कंपनी प्रतिनिधीशी याबाबत सविस्तर चर्चा वाटाघाटी करुन निर्णय घ्यावा लागेल.

तसेच-

२) मागील वर्षी सन २०१३-१४ साठी ४५० मनुष्यबळ व २३९ स्वच्छता कामी लागणारी मशिनरी उपकरणे केमिकल साहीत्यासह दरमहा देत असलेले देय रक्कम रु. ६४,२८,५७१/- व पुढील वर्षासाठी

४२ मनुष्यबळ ही संख्या वाढवुन, याकामी दरमहा किमान वेतनावरील खर्च रु.३,०७,२२१/- असे एकूण ६७,३५,७९२/- या दरमहा येणा-या रक्कमेबाबत चर्चा वाटाघाटी करुन पुढील वर्षासाठी ४९२ मनुष्यबळ व २३९ स्वच्छता कामी लागणारी मशिनरी उपकरणे केमिकल साहीत्यासह रु. ६७,३५,७९२/- या रक्कमेवर मुदत वाढ द्यावी असे नम्र मत आहे.

**किंवा**

३) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन नव्याने ऑनलाईन टेंडर प्रक्रियेद्वारे निविदा मागविणे, होणा-या निर्णयानंतर, सदरचा वार्षिक खर्च १० लाखापेक्षा जास्त असल्याने, होणारी एकूण मंजुर रक्कमेच्या खर्चासाठी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घ्यावी लागणार आहे.

तरी १, २ व ३ या मुद्यांवर चर्चा होऊन यावर निर्णय घेणेसाठी, कंपनी प्रतिनिधींना मा.त्रीसदस्य समिती सभेपुढे चर्चा वाटाघाटीसाठी बोलावून अंतिम निर्णय घेणेकामी सदरचा विषय मा.त्रीसदस्य समितीपुढे निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.१६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या साईआश्रम भक्तनिवासकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनन्स्/ स्वच्छता (आऊट सोर्सिंग) काम करत असलेले मे.बी.व्ही.जी. इंडीया लि, पुणे यांची मुदत दि.३१.०३.२०१४ रोजी संपुष्टात येत असलेने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता उपरोक्तकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्यांडून निविदांची मागणी करणेत यावी. याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,२४,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत आहे त्याच अटी/ शर्तीवर मे.बी.व्ही.जी.इंडीया लि, पुणे यांना मुदतवाढ देणेत यावी व दरम्यानचे कालावधीत याकामी येणाऱ्या खर्चास संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठास अर्ज करणेत येऊन, मा.खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१४** **साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील पेस्ट- कंट्रोल, रोडेंट कंट्रोल, फॉंगिंग ट्रिटमेंट (धुरीकरण) व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) इत्यादी कामे आहे त्याच मंजुर दरात परंतु सर्व्हिस टॅक्स लागु करुन सन दि.०१.०४.२०१४ पासुन तीन वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देऊन दर मंजुर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.०८/१२/२०१२ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.१००९ अन्वये साईआश्रम भक्तनिवास विभागातील पेस्ट कंट्रोल, रोडेंट कंट्रोल, फॉंगिंग ट्रिटमेन्ट (धुरीकरण) व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) इत्यादीचे काम मे. जी. टी. पेस्ट कंट्रोल प्रा.लि. पुणे यांचे दर मान्य करुन त्यांना जा.नं. एसएसएस/वशी- साई आश्रम-१/ ५८७४/ २०१३ दि.२३/०३/२०१३ नुसार कार्यादेश देण्यात आलेला होता. त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

**अ) पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल करणे**

| १२ इमारतीमधील खोल्या , टॉयलेट , बाथरुम व स्टोअर रुम यांचे एकूण क्षेत्रफळ ३,४९,७३५ चौ. फुट<br><br>एका इमारतीचे क्षेत्रफळ | | इमारती संख्या | पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल करणे एका वर्षाकरीता (वर्षातुन सहा फवारणी) इमारतीनिहाय वार्षिक रक्कम प्रती चौरस फुटाप्रमाणे रु. ०.९० पैसे | एकुण रक्कम रु. पै. |
|---|---|---|---|---|
| एका इमारतीसाठी I.W.C. | २८,९०८.७२ चौ.फुट | ०५ | २६,०१७.८४ | १,३०,०८९.२० |
| एका इमारतीसाठी E.W.C. | २९,२७९.९२ चौ.फुट | ०७ | २६,३५१.९२ | १,८४,४६३.४४ |
| R- Block मधील टॉयलेट | २३२.३२ चौ.फुट | ०१ | २०९.०८ | २०९.०८ |
| | **एकूण इमारती** | **१३** | **एकुण** | **३,१४,७६१.७२** |
| | | | **पुर्णांकित रक्कम** | **३,१४,७६२.००** |

**ब) फॅंगिंग ट्रिटमेन्ट (धुरीकरण)**

| अ. नं. | विभाग | तपशील | धुरीकरणाचा दर<br>(फॉगिंग ट्रिटमेंट)<br>(प्रती फवारणी १५ दिवसासाठी एक)<br>(महिन्यातुन २ फवारणी)<br>बारा महिन्यासाठी एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| १ | साईआश्रम भाग - १ | फॉगिंग ट्रिटमेंट (मलेरीया, मच्छर,डेंगु मच्छर, चिकनगुनीया मच्छर इत्यादीसाठी) चारही बाजुचे क्षेत्रफळ ४,१८,२२० चौ.फुट | रु. २२२० /- प्रति फवारणी x ०२ फवारण्या x १२ महिने = रु. ५३,२८०/- |
| | | **एकुण रुपये** | **५३,२८०/-** |

टिप :- फॅंगिंग ट्रिटमेन्ट (धुरीकरण) आवश्यकतेनुसार करुन घेण्यात येईल.

**क) डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval)**

| अ. नं. | विभाग | तपशील | डास,आळी प्रतिबंधक फवारणी दर<br>(जुन २०१३ ते ऑक्टोबर २०१३ या कालावधीसाठी)<br>(प्रती फवारणी १५ दिवसासाठी एक)<br>(महिन्यातुन २ फवारणी )<br>पाच महिन्यासांठी एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| १ | साईआश्रम भाग - १ | डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) (जुन २०१३ ते ऑक्टोबर २०१३ या कालावधीसाठी) चारही बाजुचे क्षेत्रफळ ४,१८,२२० चौ.फुट | रु . ८०० /- प्रति फवारणी x ०२ फवारण्या x ०५ महीने = रु. ८,०००/- |
| | | **एकुण रुपये** | **८,०००/-** |

टिपः- डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) आवश्यकतेनुसार करुन घेण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ) | पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल करणे | ३,१४,७६२.०० |
| ब) | फॅंगिंग ट्रिटमेन्ट (धुरीकरण) | ५३,२८०.०० |
| क) | डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) | ८,०००.०० |
| | **एकुण रुपये** | **३,७६,०४२.००** |

सदर कामी पार्टीने अटी/ शर्ती मान्य असले बाबत दि.२६/०८/१३ रोजी करारनामा करुन दिलेला आहे.

सदरचा विभाग नव्याने सुरु झालेला असून, सन २०१३- १४ या आर्थिक वर्षामध्ये माहे एप्रिल २०१३ ते डिसेंबर -२०१३ अखेर प्रत्यक्षात १,१२,३८०/- एवढा किटकनाशक फवारणी कामी खर्च झालेला असून जानेवारी २०१४ ते मार्च २०१४ अखेर या तीन महिन्यांचा संभाव्य खर्च रु.६०,०००/- इतका होईल, असे एकूण या आर्थिक वर्षात रु.१,७२,३८०/- खर्च अपेक्षित आहे. त्याचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे-

| अ.न. | माहे | सदर कामासाठी अदा करण्यात आलेले बील खर्च रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | पहिली पेस्ट कंट्रोल फवारणी | ५२४६० |
| २ | दुसरी पेस्ट कंट्रोल फवारणी | ५२४६० |
| ३ | फॉगींग ट्रिटमेट १ वेळा व अॅन्टी लारवल ट्रिटमेंट -१ वेळा | ७४६० |
| | **एकूण झालेला खर्च** | **१,१२,३८०** |
| ४ | जानेवारी- २०१४ ते मार्च २०१४ अखेर होणारा संभाव्य खर्च | ६०,००० |
| | **एकूण खर्च** | **१,७२,३८०** |

सबब सदरच्या कामाचा कालावधी दि.३१/०३/२०१४ रोजी संपणार आहे. त्यामुळे पुढील तीन आर्थिक वर्षासाठी संबंधीत कॉन्ट्रॅक्टरने खालील प्रमाणे अर्ज सादर केलेला आहे.

मे. जी. टी. पेस्ट कंट्रोल प्रा. लि. पुणे सन २०१३-१४ साठी या कामासाठी एका वर्षाकरीता प्रति चौरस फुटाप्रमाणे दर दिलेले आहेत. त्याच दरात पुढील तीन वर्षासाठी सदर काम करण्यास तयार आहेत तसेच त्यांनी पत्रात नमुद केलेले आहे की, आम्ही सन २०१३-१४ साठी जे वार्षिक दर दिलेले होते त्या दरामध्ये आमचे कडून सर्व्हिस टॅक्स लागू करणेची प्रक्रीया झालेली नव्हती त्यामुळे आम्हास हा टॅक्स शासन दरबारी भरावा लागला.

त्यानुसार या कामासाठी आम्हास पुढील कालावधीच्या कार्य आदेशामध्ये देय असलेले सेवाकर समावेशक दर मंजुर करुन सर्व्हिस टॅक्ससह दर खालीलप्रमाणे सादर केलेले असून कॉलम नंबर ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दर मान्य करुन आम्हास साईबाबांची सेवा करण्याची संधी द्यावी. अशी विनंती केलेली आहे.

| अ. न. | तपशील | सन २०१३-१४ कालावधीतील दर रुपये/ पैसे प्रती नग | शासन नियमानुसार कर समाविष्ठ केल्यास होणारी वाढ रु. पै | सर्व समावेशक सेवा १२.३६% आकारुन रु. पैसे. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | **किटकनाशक फवारणी** १२ इमारतीमधील खोल्या, टॉयलेट, बाथरुम व स्टोअर रुम यांचे एकूण क्षेत्रफळ ३,४९,७३५ चौ. फुट | ०.९०पैसे | ०.११ पै. | रु १.०१ पैसे प्रति चौ.फुट | पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल करणे एका वर्षाकरीता (वर्षातुन सहा फवारणी) इमारतीनिहाय वार्षिक रक्कम प्रती चौरस फुटाप्रमाणे **रु.३,५३,२३२.३५ पै** |
| २ | **फॉगिंग ट्रिटमेंट** (मलेरीया, मच्छर, डेंगु मच्छर, चिकनगुनीया मच्छर इत्यादीसाठी) चारही बाजुचे क्षेत्रफळ ४,१८,२२० चौ.फुट | रु. २२२० /- प्रति फवारणी | रु.२७४ | रु. २४९४/- प्रति फवारणी | धुरीकरणाचा दर (फॉगिंग ट्रिटमेंट) (प्रती फवारणी १५ दिवसासाठी एक) (महिन्यातुन २ फवारणी ) बारा महिन्यासाठी एकुण रक्कम **रु. ५९,८५६/-** |
| ३ | **(Anti Larval)** डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) (जुन ते ऑक्टोबर या कालावधीसाठी) चारही बाजुचे क्षेत्रफळ ४,१८,२२० चौ.फुट | रु . ८०० /- प्रति फवारणी | रु.९९/- | रु.८९९/- प्रति फवारणी | डास, आळी प्रतिबंधक फवारणी दर (जुन ते ऑक्टोबर या कालावधीसाठी) (प्रती फवारणी १५ दिवसासाठी एक) (महिन्यातुन २ फवारणी) पाच महिन्यासांठी एकुण रक्कम **रु.८,९९०/-** |

सदर कंपनीने आहे त्याच दरामध्ये काम करण्यास तयार असल्याचे म्हटले असून, शासनाला भरण्यात येणारा सर्व्हिस टॅक्स (१२.३६%) आहे त्याच दरावर लागू होऊन त्या सह दर मान्य करुन कामाची संधी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

नियमाप्रमाणे ज्या कॉन्ट्रॅक्टरकडे सर्व्हिस टॅक्स नंबर असतो अशा कॉन्ट्रॅक्टरला सर्व्हिस टॅक्स वेगळा दिला जातो, परंतु दरपत्रक भरतांना सर्व्हिस टॅक्स नमूद करणे आवश्यक आहे. संबंधीत कॉन्ट्रॅक्टर यांनी मागील वर्षाचे दर भरतांना सर्व्हिस टॅक्स नमुद केलेला नाही. असा देय होणारा सर्व्हिस टॅक्स रक्कम कॉन्ट्रॅक्टरला दिल्यानंतर ती सर्व्हिस टॅक्सची रक्कम शासनाला भरण्याची जबाबदारी संबंधीत कॉन्ट्रॅक्टर यांची असते.

तरी मे.जी टी पेस्ट कंट्रोल प्रा लि पुणे यांचेकडे सर्व्हिस टॅक्स नंबर असून त्यांनी मागील वर्षी दर भरतांना सर्व्हिस टॅक्स नमूद न केल्या बाबतची चुक त्यांच्या लक्षात आली, तेंव्हा त्यांनी त्यांचे अर्जात आहे तेच दर पुढील तीन वर्षासाठी देऊन फक्त शासनाला भरावयाचा सर्व्हिस टॅक्स १२.३६ % ची मागणी केलेली आहे असे त्यांच्या अर्जावरुन दिसते.

सदर कंपनीची काम करण्याची पध्दत सेवाभावी असून काम समाधानकारक वेळेत व दर्जा राखून काम करण्याची कुवत सदर कंपनीमध्ये आहे. प्रस्तुत वर्षामध्ये किटकाबाबत साईभक्तांनी तक्रारी केलेल्या नाहीत.

त्यानुसार खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी मागील वर्षातील आहे त्याच दरामध्ये होणारा वार्षिक खर्च रु.३,७६,०४२/- + नव्याने या वर्षापासून देय होणारा सर्व्हिस टॅक्स रु. ४६,४७९/- यासह एकूण रक्कम रु. ४,२२,५२१/- खर्च अपेक्षित राहील. यामध्ये फक्त शासनामार्फत वेळोवेळी सर्व्हिस टॅक्स मध्ये जो बदल होईल त्याप्रमाणे सर्व्हिस टॅक्स या रक्कमेमध्ये कमी जास्त रक्कम होईल.

| अ.न. | तपशील | सन २०१४-१५ एकूण वर्षाचे दर | | शासन नियमा नुसार वर्षाला होणारी सर्व्हिस टॅक्स रक्कम | | सर्व करासह एकूण वर्षाला होणारी रक्कम | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रु. | पै | रु. | पै | रु. | पै |
| १ | **किटकनाशक फवारणी**<br>पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल करणे एका वर्षाकरीता<br>(वर्षातुन सहा फवारणी)<br>प्रती चौरस फुटाप्रमाणे इमारतीनिहाय एकूण वार्षिक सर्व करासह रक्कम **रु.३,५३,६६७/-** | ३,१४,७६२ | ०० | ३८,९०५ | ०० | ३,५३,६६७ | ०० |
| २ | **फॉगिंग ट्रिटमेंट**<br>(मलेरीया, मच्छर, डेंगु मच्छर, चिकनगुनीया मच्छर इत्यादीसाठी)<br>चारही बाजुचे क्षेत्रफळ ४,१८,२२० चौ.फुट<br>**धुरीकरणाचा दर** (फॉगिंग ट्रिटमेंट)<br>(प्रती फवारणी १५ दिवसासाठी एक)<br>(महिन्यातुन २ फवारणी )<br>बारा महिन्यासाठी सर्व करासह एकुण रक्कम<br>**रु. ५९,८६५/-** | ५३,२८० | ०० | ६,५८५ | ०० | ५९,८६५ | ०० |
| ३ | **(Anti Larval)**<br>डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी<br>(जुन ते ऑक्टोबर या कालावधीसाठी)<br>चारही बाजुचे क्षेत्रफळ ४,१८,२२० चौ.फुट<br>(प्रती फवारणी १५ दिवसासाठी एक)<br>(महिन्यातुन २ फवारणी)<br>पाच महिन्यासांठी एकुण रक्कम **रु.८,९८९/-** | ८,००० | ०० | ९८९ | ०० | ८,९८९ | ०० |
| | **एकूण** | ३,७६,०४२ | ०० | ४६,४७९ | ०० | ४,२२,५२१ | ०० |

यासाठी-

**१)** मे. जी.टी. पेस्ट कंट्रोल पुणे यांचे दि.२१/०१/२०१४ रोजीचे विनंती अर्जानुसार मागील वर्षाच्या आहे त्याच मंजुर दरानुसार व या वर्षापासुन सर्व्हिस टॅक्ससह दरवर्षी कंपनी बरोबरच्या करारनाम्याचे प्रत्येक वर्षी नुतनीकरण करुन सन २०१४-१५ या वर्षासह पुढील दोन वर्षासाठी असे एकूण तीन वर्षाकरीता मुदतवाढ देणे व या कामी येणारा खर्च रु.३,७६,०४२/- व यावर १२.३६ % ने संभाव्य सर्व्हिस टॅक्स रक्कम रु. ४६,४७९ /- सह एकूण रु.४,२२,५२१/- इतक्या खर्चासह संबंधीत कंपनी प्रतिनिधीला मा. त्रीसदस्य समितीपुढे चर्चा वाटाघाटी कामी बोलावून अंतिम निर्णय घेणे.

**अथवा**

**२)** सन २०१४-१५ या आर्थिक वर्षा साठी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नव्याने निविदा मागविणे,

तरी १ व २ या मुद्यांवर चर्चा होऊन अंतिम निर्णय घेणेकामी सदरचा विषय मा. त्रीसदस्य समितीपुढे निर्णयास्तव सादर

**निर्णय क्र.१६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील पेस्ट- कंट्रोल, रोडेंट कंट्रोल, फॉंगिंग ट्रिटमेंट (धुरीकरण) व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) इत्यादी कामे मे. जी टी पेस्ट कंट्रोल पुणे यांना आहे त्याच मंजुर दरात १२.३६ % सर्व्हिस टॅक्स देण्यात येऊन पुढील तीन वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी व त्यांचेबरोबरच्या करारनाम्याचे दरवर्षी नुतनीकरण करुन घेण्यात यावे, असे ठरले.**

**तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,२२,५२१/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.१५** **साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील बेडशीट, उशीकव्हर, टॉवेल व चादर धुणे/ इस्त्री करण्याचे कामास, आहे त्याच मागील वर्षाचे दरामध्ये मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१५/०९/२०१२ व दि.१४/११/२०१३ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे अनुक्रमे निर्णय क्र.७३९ व ९११ अन्वये साईआश्रम भक्तनिवास विभागातील विषयांकीत काम श्री विजय अशोकराव चव्हाण, सावळीविहीर यांना (१) जा.नं. एसएसएस/वशी-साभनि/५८०४/२०१३ दि.२०/३/२०१३,(२) जा. नं.

एसएसएस/ वशी- साईआश्रम भक्तनिवास/४४४०/२०१३ दि.३०/१२/२०१३ नुसार कार्यादेश देण्यात आलेला होता. त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं. | तपशील | कपडे धुणे व इस्त्री करुन देणेबाबतचे प्रती नग दर |
|---|---|---|
| १ | बेडशीट | ७.०० + लागु असलेला सर्व्हिस टॅक्स |
| २ | उशीकव्हर | ३.०० + लागु असलेला सर्व्हिस टॅक्स |
| ३ | चादर | १०.०० + लागु असलेला सर्व्हिस टॅक्स |
| ४ | टॉवेल | ०४.०० ( सर्व करासह ) |

सदर कामी पार्टीने अटी/ शर्ती मान्य असले बाबत दि.०३/०८/१३ रोजी करारनामा करुन दिलेला आहे.

सदरचा विभाग नव्याने सुरु झालेला असून, संस्थानने प्रथमच या विभागामार्फत आऊटसोर्सने कपडे धुऊन इस्त्री करुन घेण्याचे काम करण्यात आलेले आहे. सन २०१३ - १४ या आर्थिक वर्षामध्ये माहे एप्रिल २०१३ ते डिसेंबर -२०१३ अखेर प्रत्यक्षात २३,९७,०२९/- एवढा लॉण्ड्री कामी खर्च झालेला असून जानेवारी २०१४ ते मार्च २०१४ अखेर या तीन महिन्यांचा संभाव्य खर्च रु.९,६९,४३८/- इतका होईल, असे एकूण या आर्थिक वर्षात ३३,६६,४६७/- खर्च अपेक्षित आहे. त्याचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे-

| अ.न. | माहे | दरमहा बेडशिट, उशीकव्हर, चादर, टॉवेल धुणे/ इस्त्री या लॉण्ड्री कामासाठी अदा करण्यात आलेले बील खर्च रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | एप्रिल -२०१३ | ८०,२५८/- |
| २ | मे -२०१३ | १,९९,५३५/- |
| ३ | जुन- २०१३ | ३,३३,४२७/- |
| ४ | जुलै-२०१३ | २,३९,७८५/- |
| ५ | ऑगस्ट -२०१३ | २,७७,७१८/- |
| ६ | सप्टेंबर- २०१३ | ३,०७,९५७/- |
| ७ | ऑक्टोबर-२०१३ | ३,४४,४०८/- |
| ८ | नोव्हेंबर -२०१३ | २,९०,७९५/- |
| ९ | डिसेंबर -२०१३ | ३,२३,१४६/- |
| | **एकूण झालेला खर्च** | **२३,९७,०२९/-** |
| १० | जानेवारी- २०१४ ते मार्च २०१४ अखेर होणारा संभाव्य खर्च (माहे डिसेंबर २०१३ चा झालेला खर्च रु.३,२३,१४६/- x ३ याप्रमाणे संभाव्य तीन महिन्यांचा खर्च) | ९,६९,४३८/- |
| | **एकूण खर्च-** | **३३,६६,४६७/-** |

सन २०१३- १४ या आर्थिक वर्षामध्ये या कामी अंदाजे रु.३३,६६,४६७/- इतकी आर्थिक उलाढाल संबंधीत पार्टीचा आपणाशी होणार आहे. संबंधीत पार्टीला वेगळा सर्व्हिस टॅक्स लागू असलेबाबत निर्णय झालेला आहे. परंतु पार्टीकडे सर्व्हिस टॅक्स नंबर नसल्याने त्यांनी डिसेंबर २०१३ अखेर सर्व्हिस टॅक्स सोडूनच बीले सादर करण्यात आलेली आहे. त्याच प्रमाणे आपणही त्यांना बीले अदा करण्यात आलेली आहेत. जे बीले अदा झालेली आहे, अशा रक्कमेचा आपणास सर्व्हिस टॅक्स संबंधीत पार्टीला देणे आपणावर बंधनकारक नाही. सर्व्हिस टॅक्स रक्कम घेण्याची व शासनाला अदा करण्याची जबाबदारी संबंधीत कॉन्ट्रॅक्टरची असते.

परंतु जर पुढील आर्थिक वर्षामध्ये सदर पार्टीने सर्व्हिस टॅक्स नंबर काढल्यास कार्यादेशानुसार आपणास पुढील होणारे देय बीलावर सध्याला लागू असलेला १२.३६% या दराने अगर महाराष्ट्र शासनाकडून ज्याप्रमाणे बदल होईल या बदला नुसार सर्व्हिस टॅक्स वेगळा द्यावा लागणार आहे. ते गृहीत धरुन पुढील आर्थिक वर्षासाठी अंदाजे मागील वर्षामध्ये संभाव्य झालेला खर्च रु. ३३,६६,४६७/- यावर पुढील वर्षासाठी होणारा वाढीव खर्च १०% ने रक्कम गृहीत धरुन रु.३७,०३,११४/- इतका खर्च अपेक्षित आहे. यावर १२.३६% सर्व्हिस टॅक्स रु.४,५७,७०५/- इतका येईल. यासह रु.४१,६०,८१९/ इतका सर्व करासह संभाव्य खर्च होईल.

सबब सदरच्या कामाचा कालावधी दि.३१/०३/२०१४ रोजी संपणार आहे. त्यामुळे पुढील सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी संबंधीत कॉन्ट्रॅक्टरने खालील प्रमाणे अर्ज सादर केलेला आहे.

साईश्रध्दा ड्राय क्लिनींग ॲण्ड लॉण्ड्री प्रोप्रा. श्री विजय अशोकराव चव्हाण, सावळीविहीर, सन २०१३-१४ साठी जे प्रती नग दर दिले आहेत त्याच प्रति नग दरात + लागू असलेला सर्व्हिस टॅक्ससह सन २०१४-१५ साठी आम्ही सदर काम करण्यास तयार आहोत. आमचे दर मान्य करुन आम्हास सेवा

करण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती दि. ३०/१२/२०१३ च्या अर्जाद्वारे केलेली असून, सदरच्या पत्रात खालील कोष्टकात दर्शविलेप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| अ.नं. | तपशील | कपडे धुणे व इस्त्री करुन देणेबाबतचे प्रती नग दर |
|---|---|---|
| १ | बेडशीट | ७.०० + लागु असलेला सर्व्हिस टॅक्स |
| २ | उशीकव्हर | ३.०० + लागु असलेला सर्व्हिस टॅक्स |
| ३ | चादर | १०.०० + लागु असलेला सर्व्हिस टॅक्स |
| ४ | टॉवेल | ०४.०० + लागु असलेला सर्व्हिस टॅक्स |

सदर पार्टीने टेंडर कालावधीमध्ये साईआश्रम भक्तनिवास मधील लॉण्ड्री संदर्भातील कामे चांगल्या प्रकारे करुन देत असल्यामुळे साईभक्तांनी समाधान व्यक्त केलेले आहे. तसेच संबंधीत पार्टीने कुठलेही दरवाढ मागितलेली नसल्याने यापुढील कालावधी साठी उपरोक्त तक्त्यात दर्शविले प्रमाणे आहे त्याच दरात बेडशिट, उशीकव्हर, टॉवेल व चादर धुणे/ इस्त्री करण्याचे कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणे संस्थानचे दृष्टीने हितावह आहे.

यासाठी-

**१)** मे. साईश्रध्दा ड्राय क्लिनींग ॲण्ड लॉण्ड्री, प्रोप्रा. श्री विजय अशोकराव चव्हाण, सावळीविहीर यांचे दि.३०/१२/२०१३ रोजीचे विनंती अर्जानुसार मागील वर्षाचे मंजुर आहे त्याच दरानुसार लॉण्ड्री कामासाठी मुदतवाढ देणे व याकामी होणारा संभाव्य खर्च रु. ३७,०३,११४/- व यावर १२.३६ % सर्व्हिस टॅक्स रक्कम रु. ४,५७,७०५/- सह एकूण अंदाजे रु. ४१,६०,८१९/- इतक्या अपेक्षित खर्चासह मान्यतेकामी मा. त्रीसदस्य समितीचे सभेपुढे चर्चा करुन निर्णय घेणे.

**अथवा**

**२)** सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन नव्याने ऑनलाईन टेंडर प्रक्रियेद्वारे निविदा मागविणे, होणा-या निर्णयानंतर सदरचा वार्षिक खर्च १० लाखापेक्षा जास्त असल्याने होणारी एकूण मंजुर रक्कमेच्या खर्चासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घ्यावी लागणार आहे.

तरी १ व २ या मुद्यांवर चर्चा होऊन अंतिम निर्णय घेणेकामी सदरचा विषय मा. त्रीसदस्य समितीपुढे निर्णयास्तव सादर

**निर्णय क्र.१६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील बेडशीट, उशीकव्हर, टॉवेल व चादर धुणे/ इस्त्री करण्याचे कामास, आहे त्याच मागील वर्षाचे दरामध्ये एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व याकामी येणाऱ्या रु.४१,६०,८१९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच याकामी येणाऱ्या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१६** **साईधर्मशाळा विभागाकडील बेडशिट उशीकव्हर व चादर धुणे/ इस्त्री करण्याचे कामाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री विजय अशोकराव चव्हाण यांनी दि. ३०/१२/२०१३ रोजीचे पत्राने सन २०१४-१५ साठी मागील मान्य दराने साई धर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशीकव्हर व चादर धुणे/ इस्त्री करणेचे वार्षिक काम करणेस तयार असल्याचे कळविले असून पूढील वर्षासाठी हि सेवा करण्याची संधी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

साईधर्मशाळा हा विभाग दि.१८/०७/२०१३ पासुन पालखी पदयात्रीतील साईभक्तांचे निवासव्यवस्थेसाठी सुरू करण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी एकुण सहा इमारती असून पैकी एक इमारत श्री साईबाबा संस्थान संचलित कनिष्ठ महाविद्यालय यांना वापरण्यासाठी दिलेली आहे.उर्वरीत पाच इमारती मध्ये प्रत्येकी ३२ हॉल नूसार एकुण १६० हॉल साईभक्तांचे निवासासाठी वापरण्यात येत आहे.

सन २०१३-१४ सालासाठी विहीत पध्दतीने निविदा मागवून मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०९/२०१२ रोजीचे सभेत तसेच दि.२२/०८/२०१२ व दि.२३/०८/२०१२ रोजी तत्कालीन प्रशासकिय अधिकारी यांनी निविदा धारकांचे लाँड्री युनिटला भेट देवून मशीनरी, कामाची पध्दत व क्षमता पाहून तसेच निम्नत्तम दर असलेल्या श्री विजय अशोकराव चव्हाण, सावळीविहीर यांचे द्वितीय निम्नत्तम दर मंजुर करण्यात आले असुन निर्णय क्र.७३९ अन्वये संबंधीतांना आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

श्री.विजय अशोकराव चव्हाण,राहणार सावळीविहार यांना जा.नं.एसएसएस/ साभनि-१/ ५८०४/ २०१३ दि. २०/०३/२०१३ रोजीच्या पुरवठा आदेशाने सन २०१३-१४ मध्ये साई धर्मशाळा या विभागाकडील बेडशीट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करणेचे वार्षिक काम (सदरचे काम दोन्ही विभाग सुरू होईल त्या तारखेपासून पुढील एका वर्षासाठी म्हणजे दि.१८/०७/२०१३ ते दि.१७/०७/२०१४ अखेर) देण्यात आलेले आहे. सदर कामाचे दर खालीलप्रमाणे दर्शविले आहे.

| अ.क्र. | इमारतीचे नांव | तपशिल | दर रूपये/पैसे प्रती नग |
|---|---|---|---|
| ०१ | साई धर्मशाळा | बेडशीट | ७.०० + लागु असलेला सर्व्हिस टॅक्स |
| | | उशी कव्हर | ३.०० + लागु असलेला सर्व्हिस टॅक्स |
| | | चादर | १०.०० + लागु असलेला सर्व्हिस टॅक्स |

उपरोक्त आदेशानुसार श्री विजय अशोकराव चव्हाण, सावळीविहीर यांनी लॉंड्रीचे काम माहे सप्टेंबर २०१३ पासून सुरू केलेले आहे. आतापर्यंत त्यांनी पाच-सहा वेळा बेडशीट, उशीकव्हर इत्यादी धुवून इस्त्री करुन दिलेले असून त्यांचे बाबतीत कोणतीही तक्रार नाही व ते काम वेळेत, चांगल्याप्रकारे करीत आहेत.

आता सन २०१४-१५ सालासाठीही साईधर्मशाळेत बेडशीट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करणेचे वार्षिक काम दयावे लागणार आहे. त्यासाठी निवीदा मागवाव्या लागतील व नेहमी प्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा, वाटाघाटी करुन निर्णयासाठी सादर करावे लागणार आहे. तथापी यापुर्वी सन २०१३-१४ या सालासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०९/२०१२ रोजीचे सभेत निर्णय क्र.७३९ अन्वये मशिनरी, कामाची पध्दत व क्षमता पाहून व चर्चा, वाटाघाटी करुन श्री विजय अशोकराव चव्हाण यांना बेडशीट,उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करणेचे वार्षिक कामासाठी आदेश देण्यात आला होता. आता त्यांनी परत उपरोक्त दर्शविलेल्या दरानुसार सन २०१४-१५ (पुढील वर्षीही) चालु दरात काम करण्यास तयार असलेचे पत्राने कळविलेले आहे.

श्री विजय अशोकराव चव्हाण, सावळीविहीर यांना परत सन २०१३-१४ चे मान्य दराने साई धर्मशाळा येथील बेडशीट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करणेचे सन २०१४-२०१५ सालासाठी वार्षिक काम द्यावे किंवा कसे यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेसाठी सादर.

**किंवा-**

सन २०१४-२०१५ सालासाठी साईधर्मशाळा येथील बेडशीट, उशीकव्हर व चादर धुणे/ इस्त्री करणेचे वार्षिक काम निवीदा पध्दतीने काढणेबाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशीकव्हर, टॉवेल व चादर धुणे/ इस्त्री करण्याचे कामास, आहे त्याच मागील वर्षाचे दरामध्ये एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम धर्मशाळा)

---

**विषय नं.१७** **श्री रामनवमी उत्सव- २०१४ साजरा करणेस व त्यास येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन सन २००४ च्या अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७(१) मध्ये खालील तरतुद आहे. राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदीरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील. त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पुजा विधी, उत्सव साजरे केले जातात.

श्री साईबाबांनी हयात असतांना शिर्डीत श्री रामनवमी उत्सव सुरु केला. त्यानुसार रानमवमी उत्सव- २०१४ हा १०३ वा उत्सव आहे.सालाबाद प्रमाणे यावर्षी श्री रामनवमी उत्सव सोमवार दिनांक ७/०४/२०१४ ते बुधवार दिनांक ९/०४/२०१४ (चैत्र शुध्द ८ शके १९३६ ते चैत्र शु.१० शके १९३६) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

या उत्सवासाठी पुढील प्रमाणे तयारी करावी लागणार आहे.

| अ.नं. | तपशील | रामनवमी -२०१४ चे उत्सवाचे अनुषंगाने करावयाची कामे |
|---|---|---|
| १ | उत्सव निमंत्रण पत्रिका व उत्सव उदीप्रसाद | भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना तसेच मान्यवरांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात. यंदाचे श्री रामनवमी उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १,७०,००० पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील. तसेच नेहमीप्रमाणे वर्तमान पत्रातून प्रेस नोट (न्यूज ॲटम) म्हणून प्रसिध्दी देण्यात येईल |
| २ | उत्सव व्यवस्था | अ) कलाकार कार्यक्रम |
| | प्रारंभ दिवस,<br>सोमवार दि.७/०४/२०१४<br>चैत्र शु ८।। शके १९३६ | सायंकाळी ७.३० ते रात्रौ.१०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदान स्टेजवर |

| | | |
|---|---|---|
| | मुख्य दिवस<br>मंगळवार, दि.८/०४/२०१४<br>चैत्र शु ९।। शके १९३६ | १) सायंकाळी ७.३० ते १०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर)<br>२) रात्री १०.०० ते सकाळी ५.०० पर्यत (०८/०४/२०१४) या वेळेत इच्छुक कलाकारांचा साईभजनांचा कार्यक्रम. या मुख्य दिवशी समाधी मंदीर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | सांगता दिवस<br>बुधवार, दि.९/०४/२०१४<br>चैत्र शु १०।। शके १९३६ | सायंकाळी ७.३० ते १०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर)<br>उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम ठरावयाचे आहेत. इच्छुक कलाकारांची पत्रे व तक्ता स्वतंत्र अवलोकनार्थ सादर केला जाईल. |
| | ब) कीर्तन कार्यक्रम | श्री रामनवमी कीर्तन कार्यक्रम ह.भ.प.दासगणू महाराज आश्रम गोरटे, हे करीत असतात. त्यांचेकडून आलेल्या कीर्तनकारापासून कीर्तने होतील. निमंत्रित कीर्तनकारांची व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रित कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदीर विभागामार्फत अदा करण्यात येईल. |
| ३ | श्री साई सत्यव्रत (सत्यनारायण) पूजा व अभिषेक पूजा | गर्दीच्या काळात व्यवस्थापनाच्या दृष्टीने उत्सवकाळात सत्यनारायण व अभिषेक पूजा बंद ठेवण्यात येतात. उत्सवकाळात दिनांक दि.७/०४/२०१४ ते दि.९/०४/२०१४ अखेर श्री साईसत्यव्रत पुजा बंद ठेवता येतील. |
| ४ | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात दि.७/०४/२०१४ रोजी सकाळी ६.१५ वाजता श्री व्दारकामाई मंदीरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दि.८/०४/२०१४ सकाळी ५.४५ वाजता त्यांची समाप्ती होईल. मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य पहिले अध्याय पाच अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नावे दि.६/०४/२०१४ रोजी मंदीर कार्यालयात नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणाऱ्या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. अखंड पारायणाकरीता व्दारकामाई मंदीर रात्रभर उघडे राहील. श्री रामनवमी उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा.सदस्यांची नावे ठरविणे आहे. |
| ५ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी सोमवार दि.७/०४/२०१४ रोजी सकाळी ९.१५ वाजता श्रींचे पालखीची गावातून मिरवणूक व मुख्य दिवशी शुक्रवार दि.८/०४/२०१४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता रथाची गावातून मिरवणूक निघेल. |
| ६ | कावडी व निशाणाची मिरवणूक | उत्सवाचे मुख्य दिवशी दिनांक ७/०४/२०१४ रोजी सकाळी ५.१५ वाजता श्रींचे कावडी व सायंकाळी ४.०० वाजता निशाणाची मिरवणूक राहील. श्री रामनवमीचे दिवशी परिसरातील गांवकरी व साईभक्त गोदावरी नदीचे पवित्र पाणी कावडीने घेऊन येतात. यासाठी समाधी मंदीराचे बाहेरील बाजूस दक्षिण गेटच्या समोर अभिषेक मुर्ती ठेऊन स्वतंत्र व्यवस्था करण्यात येते. कावडीधारकांना श्रीफळ प्रसाद दिला जातो. या वर्षीही तशी कार्यवाही करण्यात येईल. |
| ७ | विद्युत रोषणाई | श्री रामनवमी उत्सवात श्री व्दारकामाई मंडळ,मुंबई हे समाधी मंदीर, श्री व्दारकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदीर परिसरात सोईप्रमाणे विनामुल्य विद्युत रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा-नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे - येण्याचा खर्च त्यांना देण्यात येतो. या उत्सवातही त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. विद्युत विभागामार्फत त्यांना या उत्सवात रोषणाई करणेचे पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ८ | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदीर व मंदीर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने नेहमीप्रमाणे जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक अहमदनगर यांना विनंती करण्यात येईल. |
| ९ | प्रसाद-भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्नासह रुपये १०.०० या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.त्रिसदस्यीय समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलिस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणाऱ्या व्यक्तीची प्रसाद भोजनाची व्यवस्था नेहमीप्रमाणे केली जाईल. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टांन्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी चालू करावी लागतील. तशी व्यवस्था करण्यात येईल.<br>सन २०१३ चे पुण्यतिथी उत्सवात तिनही दिवसांचे मिष्टांन्न पदार्थ बुंदी |

| | | |
|---|---|---|
| | | ठेवण्यात आले होते.याही उत्सवात मागील उत्सवाप्रमाणे मिष्टांन्न देता येतील. |
| १० | लिलाव | श्रींना अर्पण केलेल्या वस्त्रांची व इतर वस्तुंची नेहमीप्रमाणे प्रसाद रुपाने जाहीर लिलावाने उत्सवाचे तिनही दिवशी विक्री करण्यात येईल. |
| ११ | देणगी काऊंटर्स | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊटर्स तीन शिफटमध्ये ठेवण्यात येतील. तसेच देणगी काऊटर्सची वेळ सकाळी ४ ते रात्रौ ११ पर्यत करण्यात येईल. |
| १२ | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणारा जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यात नेमण्यात येईल. |
| १३ | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईप्रसाद न.१ व नं.२, धर्मशाळा नं.२ , व्दारावती, भक्तनिवासस्थान इ, इमारतीमधून तसेच साईनगर, धर्मशाळा व न.भ.निवासस्थान परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी पदयात्रीसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदीर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप / शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ.व उन्हाळी मंडपही टाकावयाचे आहेत. त्यास मान्यता असावी. आवश्यकतेनुसार व गरजेनुसार त्यात वाढ करावी लागेल. पालखी धारकांची आलेल्या पत्रानुसार साईप्रसाद निवासस्थानाकडे तक्ता करण्यात येऊन त्यांचे निवासाबाबत सर्व निवासस्थाने एकत्रीत नियोजन करतील. |
| १४ | प्रथमोपचार केंद्र | मागील उत्सवात संस्थानमार्फत दिक्षीत वाडा येथे तीनही दिवशी तिन शिप्ट मध्ये व पिंपळवाडी रोड वरील दर्शनरांग प्रवेशव्दार येथे पहिल्या व तिसऱ्या दिवशी दोन शिप्ट मध्ये व मुख्य दिवशी तिन शिप्ट मध्ये असे दोन ठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात आले होते. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदीर परिसरात ठेवण्यात आली होती. त्याप्रमाणे या उत्सवात कार्यवाही करण्यात येईल. |
| १५ | पालखी व्यवस्था | श्री रामनवमी उत्सवात मुंबई तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणाऱ्या पालख्या ठेवण्याची व्यवस्था श्री साईबाबा धर्मशाळा येथे करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. येणाऱ्या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. त्याचप्रमाणे येणाऱ्या पालख्यांनसाठी पिण्याचे पाण्याची व्यवस्था सिन्नर ते शिरडी रस्त्यावर मागील श्री रामनवमी प्रमाणे यंदाही करावी लागणार आहे. त्या सबंधी खर्चाची टिपणी पाणीपुरवठा विभाग तयार करुन मंजुरीसाठी सादर करतील. गरजेनुसार पालख्या मुक्कामाचे ठिकाणी खर्डी, लतीफवाडी, घाटनदेवी, खंबाळे, वेल्लोळी, नासिक, शिंदे, सिन्नर (एमआयडीसी), खोपडी, दत्तमंदीर, पांगरी, वावी, हॉटेल वनराई, पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोण फाटा, सायाळे, जवळके , डोऱ्हाळे, इ. ठिकाणी पालखी मंडप, वीजव्यवस्था व पाणी व्यवस्था करणेत येईल. तसेच दोन वर्षापासून पालखीतील पदयात्री शिर्डी मध्ये आल्यावर त्यांना संस्थानतर्फे एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून विनामुल्य देण्यात येते. त्यानुसार यावर्षीही एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून विनामुल्य देण्यात येईल. |
| १६ | कुस्त्या हंगामा | श्री रामनवमी उत्सवात कुस्त्यांचा हंगामा गावकऱ्यांमार्फत भरविण्यात येतो. श्री रामनवमी उत्सवाचे १०३ वे वर्षे आहे. मागील उत्सवात कुस्त्यांसाठी रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख मात्र) खर्चास मंजूरी देण्यात आलेली होती. यावर्षी द्यावयाची रक्कम निश्चित करणे आहे. अंदाजपत्रकीय तरतुदीत मागील वर्षाप्रमाणे रु.३ लाखाची तरतुद दर्शविण्यात आलेली आहे. मा.त्रिसदस्यीय समितीचे मंजुरीनुसार सदर तरतुद कमी / जास्त करता येईल. |
| १७ | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉलला पाणी सोडणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १८ | कार्यक्रमाची सांगता | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील. |
| १९ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री रामनवमी उत्सव -२०१३ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४९,६०,०००/- (अक्षरी रुपये एकोणपन्नास लाख साठ हजार मात्र) इतक्या रकमेस मंजुरी देण्यात आली होती. प्रत्यक्ष खर्च रुपये ३३,०४,१७९/- (रुपये तेहतीस लाख चार हजार तिनशे एकोणसाठ मात्र) इतका खर्च झाला होता.<br>श्री रामनवमी-२०१४ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४७,००,०००/- (रुपये सत्तंचाळीस लाख मात्र) मंजूरीसाठी सादर केलेले आहे. |

तरी श्री रामनवमी उत्सव- २०१४ साजरा करणेस, याकामी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रुपये ४७,००,०००/- (रुपये सत्तेचाळीस लाख) चे खर्चास मान्यता असावी.

अवलोकनार्थ व निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.१६८ यावर सविस्तर चर्चा होऊन, सालाबादप्रमाणे श्री रामनवमी उत्सव- २०१४ साजरा करणेकामी प्रस्तावित कार्यवाही करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.४७,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ श्री. विजय नायडू, कोपरगांव यांची "तांत्रिक सल्लागार" म्हणून नेमणूक होणेबाबत .**

**प्रस्ताव-** श्री.विजय नायडू सो., कोपरगांव हे संस्थानला मागील १५ वर्षापासून संस्थानमधील संगणकीकरणाचे कामामध्ये व संबंधीत यंत्रसामुग्रीच्या दुरुस्ती-देखभालीसाठी तांत्रिक सल्ला देणेसाठी सक्रीय सहकार्य व विनामुल्य वेळ देत आहेत. श्री.विजय नायडू स्वतः व त्यांचे कुटंबीय हे निस्सीम साईभक्त असल्याने आजपर्यंत त्यांनी सदरील काम विनामूल्य केलेले आहे. संस्थानमधील संगणकीकरणाबाबत आजपर्यंत आलेल्या दैनंदिन व विशेष प्रसंगी आलेल्या अडचणी/ समस्या सोडविण्यासाठी त्यांनी तत्परतेने मदत केलेली असून सदरची सेवा विनामोबदला केलेली आहे. तसेच जा.नं.एसएसएस/वशी/आयटी/१००५२/ २००३ दि. २४/१२/२००३ रोजीचे पत्र अन्वये त्यांची तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. जा.नं.एसएसएस/वशी-०१/४१६३/२००६ दि.२७/०३/२००६ व जा.नं.एसएसएस/वशी-०१/ ४५०४/ २००८ दि. २७/०३/२००८ नुसार त्यांना मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

दिनांक ०६/०९/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७३४ नुसार माहिती तंत्रज्ञान विभागासाठी सल्लागार म्हणून नेमण्यात आलेले स्थानिक मानद तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडू, कोपरगाव, श्री तेजांशू न्याती, पूणे या तांत्रिक सल्लागारांची समिती स्थापन करुन सदर समितीचे अध्यक्ष म्हणून श्री. के.व्ही.रमणी यांची नेमणूक करणेबाबत निर्णय झालेला आहे. परंतू त्यावेळी श्री विजय नायडू, कोपरगाव व श्री तेजांश न्याती, पूणे यांना तांत्रिक कारणास्तव नेमणूक पत्र देण्यात आलेले नाही. माहिती तंत्रज्ञान विभागासाठी श्री.विजय नायडू, कोपरगाव यांना स्थानिक तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक देणेबाबत दिनांक ३०/०१/२०१४ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे समवेत चर्चा झालेली आहे.

**मागणी:** तंत्रज्ञानात वेळो-वेळी होणारे बदल तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाचे दैनंदिन कामांमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी सोडविणेसाठी मा. श्री विजय नायडू, कोपरगांव यांची कोणत्याही प्रकारचे मानधन न देता यापुढील पाच वर्षाकरीता तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात यावी, असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** तंत्रज्ञानात वेळो-वेळी होणारे बदल तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाचे दैनंदिन कामांमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी सोडविणेसाठी श्री विजय नायडू, कोपरगांव यांची कोणत्याही प्रकारचे मानधन न देता यापुढील पाच वर्षाकरीता तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्ती करणेसाठीचे मान्यतेस्तव सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.१६९ यावर सविस्तर चर्चा होऊन, तंत्रज्ञानात वेळो-वेळी होणारे बदल तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाचे दैनंदिन कामांमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी सोडविणेसाठी श्री.विजय नायडू, कोपरगांव यांची विनामोबदला तांत्रिक सल्लागार म्हणून पाच वर्षाकरीता नियुक्ती करणेत यावी, असे ठरले.**
(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२ शिर्डी नगरपंचायत हद्दीतील सर्व्हे क्र. १ आरक्षण क्र. १३ अ व १३ ब मधिल त्रिकोणी जागेतील अतिक्रमण काढलेल्या जागेस कम्पाऊंड करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायत हद्दीतील सर्व्हे क्र. १ आरक्षण क्र. १३ अ व १३ ब मधिल त्रिकोणी जागेतील अतिक्रमीत भागातील काही दुकाने नगरपंचायत मार्फत काढलेली आहे. सदर जागेवर पुन्हा अतिक्रमण होवू नये म्हणून अतिक्रमण काढलेनंतर तातडीने चेनलिंक जाळीचे कंपाउंड करणेत आले होते. परंतू सदरचे चेनलिंक जाळीचे कम्पाऊंड बऱ्याच भागात निघालेले असून बऱ्याच ठिकाणी दुकानदार यांनी पुन्हा अतिक्रमण केले. दि. ०८/०२/२०१४ रोजी नगरपंचायत यांनी सदरहू अतिक्रमण पुन्हा काढले. त्रिकोणातील जागा संस्थान परिसराचे लगत असल्यामुळे संस्थानला सदरहू जागेची आवश्यकता आहे. मा. कार्यकारी अधिकारी सो यांनी त्रिकोणातील सदरहू अतिक्रमण काढलेल्या भागात मंदिर परिसराकरीता करणेत आलेल्या कम्पाऊंडप्रमाणे विट दगड बांधकामासह कास्ट आयर्न ग्रीलचे कम्पांऊड करणेबाबत सूचना केली आहे.

त्रिकोणातील दुकानगाळ्यांपैकी ताब्यात मिळालेल्या जागा हया विखुरलेल्या भागात आहे. त्यामुळे लहान लहान जागेवर मंदिर परिसराचे कंपाऊंड सदृश्य कंपाऊंड करणे तांत्रिकदृष्ट्या योग्य वाटत नाही. सदर त्रिकोणातील सद्यस्थितीतील जागेचे कडेने खालील पर्यायाप्रमाणे कंपाऊंड करता येईल.

**पर्याय क्र. १.** त्रिकोणातील सेवाधाम समोरील जागा ही मोठ्या प्रमाणात मोकळी असून सदर जागेच्या पूर्व व पश्चिम बाजूस चार फुटापर्यंत विट दगड बांधकाम करुन त्यावर कास्ट आयर्न ग्रीलचे कंपाउंड करता येईल. याकामी रु. १३,०२,५००/- मात्र इतका अंदाजे खर्च येईल.

**पर्याय क्र. २.** त्रिकोणातील विखुरलेल्या भागातील मोकळया जागेचे कडेने जमीन लेव्हल पर्यंत दगड बांधकाम व त्यावर ४ फुट ऊंचीचे विट बांधकाम करणेकामी एकूण १९९ मी. लांबीची विखुरलेल्या भागातील कंपाउंड भिंत बांधणेकामी रु. ६,५१,७२५/- खर्च येईल.

शिर्डी नगरपंचायत हद्दीतील सर्व्हे नं.१ (त्रिकोण) ची जागा शासनाच्या मालकीची आहे. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे आरक्षण क्र. १३अ उत्तरेकडील क्षेत्र १५ गुंठे बगीच्यासाठी राखीव असलेले क्षेत्र संस्थानला आवश्यक आहे म्हणून संस्थानला देणेबाबत दि.०१/०१/२००८ रोजी विनंती पत्र देणेत आले होते. याबाबत त्यांचे दिनांक १५/०५/२००८ रोजीचे पत्राने सदर जागेबाबत बाब न्याय प्रविष्ट असल्याने संस्थानची विनंती मान्य केलेली नाही. सदरहू जागा संस्थानला आवश्यक असल्यामुळे सदर जागेचे कडेने वरीलप्रमाणे पर्याय क्र.२ नुसार कंपाऊंड भिंतीचे बांधकाम करावे असे मत आहे. तरी वरीलप्रमाणे पर्याय क्र.१ व पर्याय क्र.२ बाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१७० **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत हद्दीतील सर्व्हे क्र. १ आरक्षण क्र. १३ अ व १३ ब मधिल त्रिकोणी जागेतील अतिक्रमण शिर्डी नगरपंचायतीमार्फत काढणेत आलेले असून सदर जागा महाराष्ट्र शासनाचे मालकीची आहे. या जागेवर पुन्हा अतिक्रमण होऊ नये याकरिता पक्क्या स्वरुपाचे कंम्पाऊंड भिंतीचे बांधकाम संस्थानमार्फत करणेत यावे. सदरहू जागा भक्तांच्या सोयी-सुविधांसाठी सुयोग्य असून संस्थानकडे हस्तांतरीत करणेच्या कार्यवाहीसाठी वेळ लागेल. याकरिता संस्थानकडे तात्पुरत्या स्वरुपात वापरास घेणेसाठी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना प्रस्ताव सादर करणेत यावा. दरम्यान याठिकाणी पक्क्या स्वरुपाचे कंम्पाऊंड भिंतीचे बांधकाम करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र. १५२ ते १७० सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्री ०८.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| (स्वाक्षरीत) | (स्वाक्षरीत) | (स्वाक्षरीत) |
| (अजय मोरे) | (रुबल अग्रवाल) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी

**निर्णय क्र.१७० यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत हद्दीतील सर्व्हे क्र. १ आरक्षण क्र. १३ अ व १३ ब मधिल त्रिकोणी जागेतील अतिक्रमण शिर्डी नगरपंचायतीमार्फत काढणेत आलेले असून सदर जागा महाराष्ट्र शासनाचे मालकीची आहे. या जागेवर पुन्हा अतिक्रमण होऊ नये याकरिता पक्क्या स्वरुपाचे कंम्पाऊंड भिंतीचे बांधकाम संस्थानमार्फत करणेत यावे. सदरहू जागा भक्तांच्या सोयी-सुविधांसाठी सुयोग्य असून संस्थानकडे हस्तांतरीत करणेच्या कार्यवाहीसाठी वेळ लागेल. याकरिता संस्थानकडे तात्पुरत्या स्वरुपात वापरास घेणेसाठी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना प्रस्ताव सादर करणेत यावा. दरम्यान याठिकाणी पक्क्या स्वरुपाचे कंम्पाऊंड भिंतीचे बांधकाम करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**तसेच, श्री साईबाबा विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे आयोजित करणेत येणाऱ्या वर्षातील तीनही उत्सवाचे मुख्यदिवशी (श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा, विजयादशमी) श्री साई प्रसादालयामध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत मोफत प्रसादभोजन देणेत यावे, अशी समितीची इच्छा असून कोणत्या प्रकारचे विशिष्ट पदार्थ प्रसादभोजनामध्ये देता येतील हे ठरविणेसाठी आराधना विधीसाठी येणारे ब्राम्हण, गावकरी, प्रसादालय विभागप्रमुख व संस्थानचे अधिकारी यांची एकत्रित बैठक आयोजित करुन त्याचा सविस्तर अहवाल त्रिसदस्यीय समितीपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग, अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**दि.०४.०२.२०१४ चे सभेतील निर्णय-**

**विषय नं.२०** जीवनदायी योजनेअंतर्गत शस्त्रक्रियांसाठी वापरण्यात येणाऱ्या साधणसामुग्रींचे ओरीजीनल टॅक्स इन्व्हाईसेस उपलब्ध होऊ शकत नसलेल्या शस्त्रक्रियांच्या बीलांमधून टॅक्स इन्व्हाईसेस पोटी रक्कम कपात करणेस मान्यता देण्यात येऊन बीले सादर करणेबाबत.

**निर्णय क्र.१००** यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे इनव्हॉइसेस् उपलब्ध होऊ शकत असलेल्या एकुण ५५०० रुग्णांच्या फाईल तात्काळ मा.उपसंचालक, आरोग्य विभाग, नाशिक कार्यालयात सादर करणेत याव्यात व उर्वरित २००० बीलांसाठी आवश्यक असलेल्या टॅक्स इनव्हॉईसेस् अभावी अनुज्ञेय होऊ शकत नसलेली रक्कम कपात करुन मिळणेबाबत पत्रव्यवहार करावा.

तसेच, मोठ्या प्रमाणावर रक्कम प्रलंबीत राहील्याने झालेल्या अर्थिक नुकसानीस जबाबदार असलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करुन त्याचा अहवाल वैद्यकिय संचालक यांनी पुढील त्रिसदस्यीय समिती सभेपुढे सादर करावा, असे ठरले.

---

**विषय नं.३३** Stent चे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत.

**निर्णय क्र.११३** यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन, प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

तसेच, समितीने यापुर्वी समप्रमाणात स्टेंट वापरण्यात यावेत, असा निर्णय घेतलेला आहे, परंतु या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही, असे समितीच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे कोणते डॉक्टर कोणत्या कंपनीचे स्टेंट वापरतात व यामुळे संस्थानला किती आर्थिक अनुदान भरावे लागत आहे, याबाबतचा सविस्तर अहवाल पुढील सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.

---

**दि.१५.०२.२०१४ चे सभेतील निर्णय-**

**विषय नं.०६** सुरक्षा साहित्यांचे Comprehensive AMC कॉन्ट्रॅक्ट मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोएडा यांना देणेबाबत.

**निर्णय क्र.१५७** यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोएडा यांचेबरोबरच्या कराराची मुदत संपुष्टात आलेने त्यांनी दि.१० जानेवारी- २०१४ पासून सेवा देणे बंद केलेले आहे व त्यांचे बरेचसे कॅमेरे बंद स्थितीत आहेत. सदर कंपनीला पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देणेकामी श्री.प्रणव वर्मा, एक्झ्युटीव्ह डायरेक्टर, मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोएडा यांना सभेपुढे बोलविणेत आले होते. समितीने त्यांचेबरोबर चर्चा केली व मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोएडा यांची कार्यपध्दती समाधानकारक नाही, त्यामुळे सदरहूकामी नवीन टेंडर मागविणेत यावे, मात्र तत्पुर्वी मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन कंपनी, नोएडा यांचेप्रतिनिधींना पुढील सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत यावे, असे ठरले.

---